
नभरंग
दिवाळी विशेषांक -२०२५
कथा ,
कविता,
लेख

संपादक मंडळ

डॉ.रजनी अपसिंगेकर

वैशाली घाडगे

रश्मी (दिशा ) काळे

प्रा .श्रीपाद पदे

सल्लागार :

ad .उल्हास सावजी

सुधीर सेवेकर



मुख पृष्ठ : मानसी चाफेकर

टीप : या अंकात प्रकाशित झालेले साहित्य हे पाठवलेले व संकलीत केलेले असते त्या मुळे त्याची जबाबदारी हि प्रत्येकाची व्यक्तीगत असते . याच्याशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही

या वर्षात आपल्याला जे सोडून गेले त्यांची पोकळी कधीही भरून निघणार नाही .

नभरंग त्यांना कधीही विसरणार नाही



# संपादकीय :

"उजेडातले रंग - नभरंगचा दिवाळी अंक"

दिवाळीः!

अंधारावर मात करणारा प्रकाशाचा उत्सव.

आकाशात फुलझड्यांचा सोहळा, घराघरात दिव्यांची ओळ, आणि मनामनात जागलेला आनंदाचा दीप. पण या सणाचा खरा अर्थ केवळ बाहेरच्या दिव्यांत नाही – तो आहे मनातल्या उजेडात, जो आपण स्वतःसाठी आणि इतरांसाठी लावतो.

नभरंग संस्था नेहमीच सर्जनशीलतेच्या प्रकाशात समाजाचा आरसा दाखवण्याचा प्रयत्न करत आली आहे. या वर्षीच्या दिवाळी अंकात आम्ही पुन्हा एकदा विचारांच्या, कलेच्या आणि संस्कृतीच्या विविध रंगांना एकत्र आणले आहे. प्रत्येक लेख, कविता, कथा आणि मुलाखत – हा या काळोख्या जगातला एक छोटा दिवा आहे.

आजच्या धावपळीच्या, तंत्रज्ञानाच्या आणि सोशल मीडियाच्या गर्दीत मनाचा उजेड टिकवणं तितकंच आवश्यक झालंय, जितकं तेल दिव्यासाठी. हाच उजेड नभरंगच्या प्रत्येक कलावंतात आहे – मग तो रंगमंचावर उभा असो, लेखणी हातात असो, किंवा संगीताच्या स्वरात हरवलेला असो.

या अंकात समाजातील संवेदना, नाती, पर्यावरण, मानसिक आरोग्य आणि आधुनिक माणसाच्या शोधाचा प्रवास या सगळ्या विषयांना आपण स्पर्श केला आहे. नभरंगचा प्रत्येक पान म्हणजे एक विचार - एक रंग - एक प्रकाशरेषा.

दिवाळी म्हणजे फक्त सण नाही, ती आहे आपल्या आतल्या कलाकाराला जागवण्याची वेळ. म्हणून या अंकाच्या माध्यमातून आम्ही सर्व वाचकांना सांगू इच्छितो –

आपल्या आतला "पाचवा कोपरा" शोधा,

तो कोपरा जिथे तुम्ही स्वतःला भेटता,

जिथे प्रकाश स्वतःचा अर्थ घेऊन येतो.

नभरंगच्या सर्व कलाकार, लेखक, छायाचित्रकार आणि वाचक मित्रांचे मनःपूर्वक आभार.

या दिवाळीत आपल्या आयुष्यातही नव्या रंगांचा, नव्या विचारांचा, आणि नव्या उजेडाचा सोहळा फुलत राहो –

हीच शुभेच्छा!

- संपादक मंडळ, नभरंग

"कलेचे व्यासपीठ - नभरंग"



दिवाळी किंवा दीपावली २०२५ मध्ये अमावस्या तिथी २० ऑक्टोबरपासून सुरू होऊन २१ ऑक्टोबरपर्यंत आहे.
इ
मुख्य दिवाळी म्हणजे लक्ष्मीपूजनाचा दिवस - तो २१ ऑक्टोबर २०२५ रोजी असेल.
अमावस्येची तिथी २० ऑक्टोबर दुपारी ३:४५ वाजता सुरू होईल आणि २१ ऑक्टोबर सायंकाळी सुमारे ५:५५ वाजता संपेल.
लक्ष्मीपूजनासाठी शुभ मुहूर्त (प्रदोषकाल) सायंकाळी ५:५२ ते ८:२४ वाजेपर्यंत असेल.

# दिवाळीचे पाच दिवस आणि त्यांच्या साजरे करण्याची पद्धत

दिवाळी हा सण पाच दिवस चालतो, आणि प्रत्येक दिवसाची स्वतःची ओळख व पूजा पद्धती आहे.
२०२५ च्या दिवाळीत हे दिवस आणि त्यांची रूढी अशा प्रमाणे आहेत:
दिवस नाव महत्व / काय करतात
दिवाळी अगोदरचे दिवस – घर साफसफाई करणे, सजावट, खरेदी करणे
१ धनत्रयोदशी धन, आरोग्य व संपत्ती याची पूजा सोनं-चांदी खरेदी करणे शुभ मानले जाते
२नरकचतुर्दशी : अधर्माची, अज्ञानाची नाश करण्याची पूजा; घरांवर दिवे लावणे,
३लक्ष्मीपूजन (मुख्य दिवाळी) देवी लक्ष्मीचा स्वागत, घरावरील दीये, देवी-गणेश पुजा, शुभ वेळे-चा उपयोग
४गोरक्ष-दग्ध पूजा / गोवर्धन पूजा गोवर्धन पर्वताची पूजा, श्रीकृष्णाची कथा, अन्नकूट (प्रसादांचे थाळ) सादर करणे
५ भाऊ बीज :भाव-भगिनींचा आदर, आशीर्वाद घेणे
दिवाळीचे अर्थ व धर्मशास्त्रीय पार्श्वभूमी

"दिवाळी" हे शब्द संस्कृत "दीपावली" म्हणजे दीपांची ओळ ह्यापासून आलेला आहे ङ्क अंधार दूर करण्यासाठी दिव्यांची शृंखला.
हे सण अंधकारावर प्रकाशाचा विजय, अज्ञानावर ज्ञानाचा विजय, चांगुलपणावर वाईटाचा पराभव या संकल्पनांचा साक्षीदार आहे.

विविध पुराणकथांनी दिवाळीचा संबंध जोडला आहे:
- श्रीरामचंद्रांचा १४ वर्षांनंतर वनवासातून परत आल्याचा उत्सव।
- श्रीकृष्णांनी नरकासुर यांचा पराभव केला।
- लक्ष्मी-गणेश-कुबेर यांची पूजा — संपत्ती व समृद्धीची देवतांना सन्मान।

द्वार आणि सजावट

घर स्वच्छ करणे आणि सजवणे — रंगोली, फुग्यांची माळ, विद्युत दिवे, कंदील व तोरण।
दिवे,घराच्या आत आणि बाहेर लावणे, अंधारामुळे वाटणारा उजेड वाढवणे।
खरेदी, भेटवस्तू, नवीन कपडे – शुभता व आनंद देण्यासाठी।
स्वादिष्ट पाककृती, मिठाई, गरम जेवण ङ्क कुटुंब, नातेवाईकांसोबत वाटून घेणे।
दिवाळी पूजाविधी, मंत्र, पूजा सामग्री (कुंकू, पुष्प, नैवैद्य इत्यादी) यांची योग्य तयारी।

# कर्म.....

भावना समजायला
शब्दांची साथ लागते
मन जुळून यायला
हृदयापासून दाद लागते

श्रीकृष्णाने कंसाला मारल्यावर, वासुदेव व देवकी,अर्थात त्याचे आई आणि वडील,यांना तुरूंगात सोडवण्यास आला.

देवकी माताने उत्सुकतेने विचारले, “बाळा,तु स्वःतच देव आहे आणि तुझ्याजवळ तर दैवी शक्ती सुद्धा आहेत; मग, तु कंसाला मारण्यास आणि आम्हाला सोडवण्यासाठी चौदा वर्षाची वाट का बघितलीस?”

श्रीकृष्ण गंभीर होऊन म्हणाला, “आदरणीय माते,-क्षमा कर.

पण मागच्या ज्नमी तु मला चौदा वर्ष वनवासासाठी जंगलात का पाठवले होतेस?”

देवकी खुप आश्चर्यचकीत झाली आणि तिने नाकारत म्हणाली, “कृष्णा,हे कस शक्य आहे? हे तु कशा-वरून म्हणतोस?”

श्रीकृष्णाने शांततेने उत्तर दिले, ङ्कमाते,तुला मागच्या जन्माबद्दल काही आठवणार नाही.मागच्या जन्मी तु कैकयी होतीस आणि पिता दशरथ होते.”

देवकी खुप आश्चर्यचकीत झाली आणि तिने कुतुहलाने विचारले, ङ्कमग,आता कौसल्या कोण आहे?”

श्रीकृष्णाने उत्तर दिले, “माता यशोदा.मागच्या जन्मी जे चौदा वर्षाचे मातृ प्रेमाला ती वंचीत राहिली,ते तिला ह्या जन्मी मिळाले”

कर्माचे फळ सर्वांनांच भोगावे लागतात,अगदी देवांची सुद्धा ह्यातून सुटका झालेली नाही.

आपल्या कर्मावर सतत लक्ष ठेवा.चांगली कर्म करा.



# जग काय म्हणेल

लेख ...

नीता चंद्रकांत कुलकर्णी

जग काय म्हणेल? या तीन शब्दांची आपल्याला विलक्षण भीती असते. ह्या जगाला सतत आपण घाबरून जगतं असतो.

एखादी जराशी वेगळी कृती करण्यापूर्वी आपण विचार करतो...हे करू का नको?

असं केल तर जग काय म्हणेल ?

आणि हे जग कधी चांगले म्हणत नाही .नेहमी नाकं मुरडत असते ,चुका काढत असते, नांव ठेवत असते.

या तथाकथित जगाला आपण भीत असतो ते जग असते तरी कसे ?... कुठे आहे हे जग?.... मुख्य म्हणजे " जग "या शब्दाचा अर्थ तरी काय?

हा जो विश्वाचा अफाट पसारा पसरलेला आहे त्याला जग असे म्हण-तात. अनेक देश, गावं ,तालुके, प्रांत ,गल्ल्या मिळून जे होते ते म्हणजे जग आहे.

मग आपण आपल्या पुरती जर एखादी कृती केली तर ती यापैकी कुणापर्यंत जाते ?त्याचा यातल्या कुठल्या गोष्टीवर परिणाम होतो ?आपण कधी याचा विचार केलेला नसतो .

जग म्हणजे आपल्याला जे लोक ओळखतात ते लोक.. म्हणजे नातेवाईक, मित्र-मैत्रिणींचा परिवार,व्यवसाय ,नोकरी करतो तिथले आणि आपल्या आसपासचे लोकं एवढ छोटसब तर आपल जग असतं. साधीशी मनाला आवडणारी कृती करताना सुद्धा आपण सावध होतो .आपणच आपल्या मनात बागुलबुवा उभा केलेला असतो. ज्या मुठभर लोकांना आपण जग समजत असतो त्यांचा आपण सतत विचार करत असतो.

स्वतःच्याच वागण्यावर निर्बंध घालत असतो. शक्यतो चौकटीत राहायला बघत असतो. ती चौकट मोडायचे धैर्य आपण करत नाही. रस्त्यात गरम खारे दाणे विकणारा माणूस आपण बघतो. त्याचा तो खरपूस वास नाकाला यायला लागतो.. ते दाणे खावेसे वाटतात .तरी-पण रस्त्यात खातं खातं गेलं तर लोक काय म्हणतील? या छोट्याशा कृतीसाठी सुद्धा आपण जगाचा विचार करतो.

टपरीवरची भजी खायला जावेसे वाटते पण आपण आपले पाय तिकडे वळवत नाही .कोणी बघितलं तर काय म्हणेल? नावं ठेवली तर..... माझ्या मैत्रिणीच्या मुलीनी आंतरजातीय विवाह ठरवला .तेव्हा मैत्रीण म्हणाली मुलगा खूप हुशार, प्रेमळ ,समंजस आहे ,घरचे लोक छान आहेत ......पण जग काय म्हणेल..... या विचारांच्या धसक्याने ती इतकी अस्वस्थ झाली की तिला मानसोपचार तज्ञांची मदत घ्यावी लागली.

तिच्या नवऱ्याने... लोकं बोलणार हे स्वीकारले होते. आणि लोकं बोललेच.. त्यांनी ते मनाला लावून घेतले नाही. त्यामुळे त्यांना त्रास झाला नाही.

काही महिन्यानंतर लोकं तिचा विवाह विसरूनही गेले. मुलगी नवऱ्याबरोबर गेली वीस वर्षे मजेत आहे...म्हणजे बघा.....

ही तर मोठी गोष्ट झाली पण साडी पेक्षा पंजाबी ड्रेस सुटसुटीत वाटतो पण जगाची भीती..... माझ्या ओळखीतल्या अजूनही किती जणींना आहे.... एक मैत्रीण मला म्हणाली सुध्दा ... नको बाई लोकं काय म्हणतील?

यात्रा कंपनीबरोबर एकटीने ट्रीपला कसे जायचे? मोठ्या दुकानातून खरेदी न करता कसे बाहेर पडायचे? या प्रश्नांची मनात भीती असल्याने त्याची उत्तरे नेहमी नकारार्थीच येतात.

जाऊदे ... मोठ्या दुकानात जाऊ नकोस.. एकटीनी ट्रीपला नाही जायच..

आपलं मन आधीच उत्तर देऊन टाकत.

हेच जग ....जरा दृष्टी आड झाले की आपलं आतल मन उफाळून वर येतं. ट्रीप ला गेलो की आपण काडीवालं आईस्क्रीम घेऊन रस्त्यात खात खात चालतो...

वर म्हणतो...

" इथं कोण येणार आहे मला बघायला?"

म्हणजे तिथे जे कोणी बघत असतात तेच आपलं जग असते. केवळ त्यांच्या इच्छे खातर आपण आपले मन मारून जगत असतो .

हे जग खरोखरच इतक्या बारीक सारीक गोष्टींचा विचार करून आपल्यावर लक्ष ठेवत असते का?

त्यातूनही समजा जगाने काही म्हटले तर त्यांचे किती ऐकायचे आणि त्याला किती किंमत द्यायची हे आपण ठरवायचं असते .

खूप मोठं जगावेगळं काही करायची आपल्यात हिम्मत नसते. तशी आपण करतही नाही. पण अगदी लहान सहान गोष्टी करायला का घाबरायचे?

साधी गोष्टम्हणजे हॉटेलात हातानी डोसा खायला सुद्धा..." आसपासचे लोक काय म्हणतील ?"

यासाठी आपण घाबरतो. काटे चमच्यांनी कसरत करत डोसा खातो. त्यापेक्षा गरम कुरकुरीत डोसा हातानी मस्त खाऊन घ्यायचा.....

आपण असे का वागलो .. याचा दरवेळी प्रत्येकाला भेटून आपण खुलासा करू शकत नाही. सांगू शकत नाही .शंकेचं निरसन करू शकत नाही. मग या लोकांच्या म्हणण्याला का घाबरायचे?

आपण आपल्या मनाला पटेल योग्य वाटेल तो निर्णय घ्यावा. कारण त्यावेळी त्या त्या परिस्थितीचा विचार करून आपण आपल्या विवेक बुद्धीने वागत असतो.

मग यात लोकांचा संबंध येतोच कुठे?
आपण प्रत्येकाचे समाधान करू शकणार नाही हे आपण पक्के लक्षात ठेवायचे असते .
.काही लोक मात्र या जगाची पर्वा न करता जगत असतात आपण त्यांना लांबून बघतो. घरी बसून त्यांच कौतुक करतो.
" यांना कसं हे जमतं?..."
असं म्हणतो आणि सोडून देतो.कारण तो आपला मार्ग नाही हे आपण पक्के ठरवलेले असते.
हे लोकं आपल्यापेक्षा वेगळे.. निराळे नसतात. पण मनाने खंबीर ,कणखर ठाम, सुदृढ विचारांचे असतात.
यांच्या कृतीबद्दल कोणी काही विचारलं तर उत्तर द्यायची त्यांची तयारी असते. त्यामुळे अशा लोकांच्या वाटेला सहसा कोणी जात नाही.
माझ्या ओळखीच्या एका काकांनी मला सांगितले की कोणी गरज नसताना फार चौकशी करायला लागलं की मी त्यांना सरळ म्हणतो,
" तुम्ही फारच प्रश्न विचारता बुवा" मग समोरचा गप्प बसतो...
काकांचे हे मला फारच आवडले..
गाढवाला घेऊन जाणाऱ्या वडील आणि मुलाची गोष्टआपण लहानपणापासून ऐकलेली असते. गोष्टीतला मतीतार्थ आपल्याला माहित असतो. यावरून कुठला बोध घ्यायचा हे पण आपल्याला कळते.
पण आपण तो घेतो का?
" ऐकावे जनाचे करावे मनाचे "
हेही आपल्याला माहीत आहे पण त्याप्रमाणे आपण कृती करतो का?
या काल्पनिक जगाच जोखड मनावरून काढून टाकून मुक्तपणे जगावं आणि जीवनाचा आनंद घ्यावा. तुमच्या अंतर्मनाला योग्य वाटेल असं वागुन तर बघा....
हळुहळु त्याची सवय होईल...

आपल मन आपणच कणखर बनवायच असत ..हे लक्षात ठेवायच.
मगच आपल्याला या तथाकथित जगाची भीती वाटत नाही.

नीता चंद्रकांत कुलकर्णी पुणे .
९७६३६३१२५५

रिमझिम पावसात भिजणं
कधी गडद धुक्यात रमणं
बेभान वाऱ्यासंग वाहणं
तुझं आणि माझं कायमचं झालं
प्रेमाच्या धुंदीत राहणं



# ज्ञानसावित्री

“मॅडम थोडी जगह दे दो ना बैठनेकू”
प्रवाशानं खचाखच भरलेल्या त्या बसमध्ये माझ्या आईच्या वयाची स्त्री विनंती करत होती.तशी मी थोडी सरकले आणि त्यांना बसायला जागा दिली.
नोकरीसाठी रोजच्या अपडाऊनमध्ये कधी मला जागा भेटत नाही तर कधी माझ्यासारखी एखादी अपडाऊनवाली मैत्रीण असतेच.आजचा दिवस या मावशीचा.
त्यांच्याजवळच्या अंदाजे दुसरीत असलेल्या मुलाला आपल्या मांडीवर घेऊन त्या माझ्या बाजूला बसल्या. दोन जणाच्या सीटवर साडेतीन जण.
गाडी गावाच्या बाहेर निघाली तशी इतकावेळ गप्प बसलेली मी एकदाची बोलायला लागले.

“किधर को जा रही हो मौसी?”

“पाथरी कू.”

“मेहमान के यहाँ?”

“नहीं जी.वहीच रहती हूँ.”

“आप भी पाथरी कू जा रही क्या?”

“नहीं नहीं मैं तो मानवत को जा रही हूँ. आज उधर मिटींग है हमारी.”

“दवाखाने में है क्या?”मला पाहिल्यावर कुणालाही मी दवाखान्यात नोकरीला आहे असं वाटतं.तसं त्या मावशीलाही वाटलं.

“ स्कूल में पढाती हूँ. “

“हाव क्या.तो मॅडम है आप.”

त्या मावशीसोबत अशा मनमोकळ्या गप्पा चालू होत्या. अशी छानशी सोबत भेटली की प्रवास सुखकर होतो असं म्हणतात. तसं यांच्यासोबत वाटत होतं. बोलता बोलता माझं लक्ष त्यांच्या दोन्ही हातांकडे गेलं. पाहते तर काय?मावशीचे दोन हात भाजलेले दिसले. कदाचित ते पूर्णच भाजले होते.पण त्यांच्या पेहरावामुळे दिसत नव्हते.माझ्या मनात असंख्य प्रश्न निर्माण झाले.क्षणात त्यांची दया आली.एव्हाना मी त्यांच्या हाताकडं पाहतेय हे त्यांच्या लक्षात आलं होतं. म्हणून त्या स्वतःला सावरून घेत होत्या.न राहावून मी म्हणाले,”मौसी ये हात को क्या हुआ? कैसे जले?”

“बहोत लंबी दास्तान है बेटी जान दो काय कू वहीच कहानी बार बार दोहराने की.”

मघाशीपासून चांगली बोलणारी व्यक्ती अचानकच अशी कशी उत्तर देऊ शकते?त्यांच्या उत्तरानं मला वाईट वाटलं.पण असं कुणाचं दुःख दिसलं की काळजात कसंतरी होतं.आपण ते दूर करू शकत नसलो तरी व्यक्त होऊन हलकं करू शकतो.म्हणूनच त्या मावशीला बोलतं करावं म्हणून मी म्हणाले,” ये साथ में का लडका कौन है?”

“पोता है.इसीके वास्तेच तो ये हाथ जले.”

“मतलब?”

“आरी मॅडम तुम्हारे से क्या छिपाना सभी गाव को मालूम.इस बच्चे की मां और मेरे बेटे में झगडा हुआ. वो पागल सांड बाहर से ढोस के आया.नशे में उसने इसकी माँ के अंग पे घासलेट डाला.बहू कू जला डाला.”

“फिर?”

“फिर क्या?घासलेट इधर उधर गिरा.देखते देखते आग फैल गयी.घबराके वो साला भागा.जलती हुई बहू को देख के मेरी तो कुछ समझ में नहीं आ रहा था.”

“बापरे!मावशी,पण तुमचे हात कसं काय भाजले?”

“अंदर ये बच्चा सोया हुआ था.” मैनें जोरो से चिल्लाई. आसपास के लोगा आए.लेकिन तब तक इसकी माँ पूरी जलखे खाक हो गयी. बच्चेको बचाते बचाते मेरे हाथ जल गए.”

तो थरारक प्रसंग ऐकून माझ्या अंगावर काटे आले.एरवी टी.व्ही.वरील बातम्यात,वर्तमानपत्रात वाचतो तशी घटना आज प्रत्यक्ष ज्यांच्यासोबत घडलीय

त्यांच्याच तोंडून ऐकत होते.

"मग तुमचा मुलगा?"

"वो क्या अपनी करनी से जेल में है.अब पश्ताने से क्या फायदा?पहेलीच दारू की गंदी आदत छोड दी होती तो.."मावशी आपल्या मुला बद्दल रागारागात बोलत होत्या.पण दुसऱ्या बाजूला त्यांच्यातील आई तडफफड करत होती.त्यांच्या डोळ्यातून पाणी येत होतं.मी त्यांना शांत केलं.

" होनी को कौन टाल सकता है भला.जीना तो पडेगा."

"तो मैं जी रहीं हूँ मॅडम.ये बिन मां बाप का बच्चा देखके रोना आता लेकिन क्या करूं.इसको मां बाप का प्यार दुंगी.पढाउंगी,लिखाउंगी.मोल मजूरी करके बड़ा आदमी बनाऊंगी."

मावशीच्या बोलण्यात जिद्द होती.शिक्षणाचं महत्त्व त्यांनी जाणलं होतं.आपल्या अशिक्षित मुलासारखं नातवाचं आयुष्य वाया जाऊ नये म्हणून त्यांचा जीव तुटत होता.

कंडक्टर ने बेल वाजवली तसं आमचं संभाषण संपवत मी म्हणाले,"चलती हूँ मौसी.अपना खयाल रखना."

"तुम भी मॅडम."

मी बसमधून उतरले पण त्या मावशी डोळ्यासमोरून जात नव्हत्या.

समाजात एकीकडं आईवडील नसलेल्या मुलांची हेळसांड होताना दिसते तर या आजीसारखी एखादी आजी खंबीरपणे पाठीशी उभी राहते.स्वत:च्या जिवाची पर्वा न करता नातवाचा जीव वाचवणारी.. स्वतः अशिक्षित असूनही शिक्षणाचं महत्त्व जाणणाऱ्या त्या ज्ञानसावित्रीला मी मनोमन वंदन केलं.

मनिषा कुलकर्णी-आष्टीकर
परभणी
मोबाईल-९५११८७५३५३



अंकूरावी हिरवी कविता (कविता)

निसर्ग न्याहाळताना
उत्साह होतो मनाला
क्षण भंगुर आयुष्यात अर्थ
मिळतो जगण्याला
निसर्गाचे महत्व असावं
सर्वांना

काहि केल्या
आज मला सूचत नाही
एकही कविता
उतरत नाही एकही शब्द काळजातला
माझ लेखनीतून
मन भरकटते आहे
इथे तिथे शुन्य होऊन
आता
ऐकू यावा कानी स्वर बासरीतून
चंद्रही यावा बाहेर काळ्याकुट्ट ढगातून
पांथस्थाने चालाव्या वाटा
किनाऱ्याने उसळू द्याव्या लाटा
गुटूर गूँ करत उतरावा
एकतरी रावा अंगणात
अनब .. दिसावा सांजवेळी इंद्रधनुष्य गगनात
स्पर्शून जावा हळूच झुळझुळणारा वारा
ऐकू यावा क्रांतीकारी
मजय हो म चा नारा

निदान ...
पाऊस तरी यावा आता
अनब . . माझ्या काळजातली
अंकूरावी हिरवी कविता
पान , फुल , फळांनी गच्च लगडलेली
कोणचीच चोच रिती राहू नये
इतपत ...

सौ . बालिका बरगळ , वसमतकर
नांदेड
मो . ९७६७६१८२१७



**नाती जगासमोर**
**दाखवायला खूप असतात**
**पण मनाने समजून घेणारी**
**सगळीच नसतात**

सहामाही परीक्षा (बालगीत )

दिवाळीच्या सुट्टीमध्ये
खूप मज्जा करू
बेत त्याचे सारे
आताच होतील सुरु

अंगणामध्ये किल्ला बांधू
भुईनळ्याचे बार उडवू
सुंदर सुंदर कांदिलाचे
दारा पुढे तोरण चढवू

नवे नवे कपडे छान
रांगोळ्यांनी अंगण सजवू
चिवडा, चकली, लाडू खात
घर आनंदाने भिजवू

धोतर, चादर पडदे लावून
एखादसं नाटक बसवू
कुठलं, कसलं सोंग काढून
आजी, आजोबांना फसवू

सहल काढू गावा बाहेर
तळ्या काठी फिरून येऊ
वाचनालयात जाऊन रोज
नवे पुस्तकं बदलून घेऊ

बेत तर खूप ठरलेत
मज्जा येईल खूप खास
त्या पूर्वी सोसावा लागेल
सहामाही चा थोडा त्रास

श्रीनिवास गडकरी
रोहा पेण पुणे



एक भाषा जी नजरेची
नजरेला कळते
शब्दांविना भावनांची मग
नकळत देवाण घेवाण होते

# शोध समाधानाचा

तांकाकाव्य प्रकार

दगदगीच्या
जीवन प्रवासात
उन पाऊस
कसरत रोजची
सदा घाई नित्याची १

दिवस रात्र
पोटासाठी धावणं
लोकल घाई
धडधड उरात
जातो ऑफिसात २

रोजचे तेच
कधी असंही होत
मोगरा फुलं
सुगंध सांडतात
समाधान देतात ३

यश मिळते
कष्ट करी सायास
पदोन्ननती
सुखावून सोडते
पगार वाढ होते ४

निर्मळ मन
सुख दुःख समान
कर्तव्य जाण
मिळते आपसुकच
मनाचे समाधान५

अहंकारात
आपले नुकसान
सोडा, मी नारा
परोपकार पुण्याय
मिळे सुखाचा घास ६

अनघा कुलकर्णी,नेरूळ

# //दिवाळसण //

गच्च अंधार डोळ्यात भरून कजाळ भरल्या पाणंदीतून जाताना पायाखालची वाट कंच्या डोळ्यांना दिसायची कळायचं नाय.
अशात अंधारावर उजेडाच्या वाकड्यातिकड्या रेषा काढत एखादा काजवा त्याच डोळ्यापुढनं सळसळायचा.पुढं पानांच्या गर्दीत कुठं बुडून जायचा कळायचं पण नाय. त्याच भानात हिरव्या-कंच पानांनी लदबदलेली फांदी काळ्या रंगात बुडवून आणल्यागत कपाळाला धडकायची.
अंगावर काटा फुटायचा. अंगभर  वीज फुटल्या-गत काळोख लकाकून जायचा.
तरी पण मित्राकडं जायची ओढ.निघायचो एकलाच निशाचरासारखा.
अंधाराची भयाण कोडी सोडवत एकलाच पाणंद-ीतून जायचो.मिट्ट काळोखात दिसायचं बंद झालं की कानाला डोळे फुटायचे.
परसभर तालीवरून खाली आलेली पाण्याची धार आणि माजलेल्या गवतातून खळखळंत जाणारं पाणी पायाखालून जाताना मज्जा वाटायची.
भिती घालवाय साठी एकलाच गाणं म्हणायचो. वा-हत्या पाण्याच्या गळ्यात माझा सूर मिसळायचो.
ओढा ओलांडून जाताना पाणी पायाशी पैंजणागत वाजायचं.माझ्या गाण्याला अनोखा ताल लाभायचा.
दुई हातानी पायजमा सावरत पैलतीरी जाताना मन मोहरून जायचं.ओढा ओलांडला की वलं काळीज पाठमोरी सोडून पुढं गेल्यागत वाटायचं.
पुढं दगडी तालीला लागून उभा आंबा अनब निर-गुडीच्या उभ्या फोकाट्या सोबतीला यायच्या.
लुकलुकत्या जीवाला तेवढाच आधार वाटायचा.
जीव धरून जरा पुढं गेलं की खडकाळ चढण



लागायची. तेवढी चढण पार केली की मित्राचं घर आवाक्यात यायचं. केवढं दिव्य पार करून पोचायचो  मैत्रीच्या ओढीनं.
दिवस दिवाळीचं असलं की तुळशीच्या दिवळीतली पणती मंद तेवताना दिसायची.
दिवसभराची कष्टाची घेपाच उरकून गोडाच्या तळणाला आयाबाया लागायच्या.आज तुझं उद्या माझं करत दिवाळीचा फराळ उरकला जायचा.
साखरपाकात मुरलेल्या कळीचा घमघमाट सुटायचा.
मित्राची माय बशीत गरम गरम पाकातली कळी वाढायची.
दिव्याच्या उजेडात तो गोड घास घेताना साखरद-ण्यागत मनभरून दोघंपण हासायचो.
खाऊन झालं की चूळ भरून गोधडी गाठायचो.
मित्राच्या हाताला उसं देऊन कवा डोळा लागायचा कळायचं नाय.
दिवाळीच्या आंघुळीसाठी मात्र पहाटंच उठून घरा-

कडं पळायचो.
माय वाट पहात असायची. उघड्या अंगानं पाटावर बसलं की बाजरीच्या पिठात खोबरेल तेल ओतून माय हातापायांना पाठी पोटाला लावायची.
कवळ्या कातडीची रगडून रगडून मळी काढायची. पहाटंच्या गारठ्यात ऊन ऊन पाण्यानी लय भारी अंघोळ व्हायची.
ओसरीला आकाश कंदिलाचा किरमीजी उजेड अनब बशीत वाढलेल्या दोन करंज्या बाहेरच्या काळोखाला वाकुल्या दाखवत खाताना कष्टक-यांच्या घरातला दिवाळसण साजरा व्हायचा.
आजच्या झगमगाटात, विद्युत रोषणाईत आणि फटाक्यांच्या जीवघेण्या आवाजात शोधतो आहे हरवलेल्या एकांताचा,काळोखाच्या ओंजळीत मंद तेवणा-या पणत्यांचा,दाराशी रंगीबेरंगी रंगात रात्र जागवणा-या आकाशकंदिलाचा आणि पहाटेच्या गारव्यात प्रसंन्नतेचं,शांतीचं गाणं आळवणारा दिवाळ-सण. अनिल कदम

**कोणत्याही नात्यांमध्ये**
**महत्त्वाचा असतो आदर आणि**
**विश्वास**
**तरच त्या नात्यांमध्ये राहतो**
**श्वास ती नाते राहते खास**

# धनंजय शेडबाळे.

कोल्हापूर जिल्हा इचलकरंजी येथे जन्म. व्यवसायाने मेकॅनिकल इंजिनियर. निसर्ग सौंदर्य हा एक छंद. वृक्षारोपण ,संवर्धन, प्लॅस्टिकचा धोका, सक्रियता, आणि सामुदायिक सहभागाद्वारे पश्चिम घाट टिकवून ठेवणे, यासारख्या संवर्धनाच्या विविध पैलू वर लक्ष केंद्रित करतात. स्थानिक बियाणे आणि विदेशी वनस्पती प्रजातीचे उत्साही संग्रहक म्हणून, गेल्या दहा वर्षांहून अधिक रोपे बनवून त्यांचे वितरण करण्याचे महत्त्वाचे कार्य करत आहेत. पीसीएमसी स्मार्ट सिटी कओअर समितीचे सदस्य, देवराई फाऊंडेशन, पुणे यांचे विश्वस्त आणि सावरकर मंडळ फ्रेंड्स ऑफ नेचर विंगचे अध्यक्ष- एनजीओ आहेत. त्यांच्या कार्यातून एक महत्त्वाचा विश्वास निर्माण झाला आहे की पेरलेले एक रोपटे जगासाठी हिरवाईचा संदेश पसरवण्यास खूप मदत करेल.

धनंजय शेडबाळे. एक व्यक्ती नव्हे चालती बोलती संस्था. अनेक कंगोरे असणारी. अत्यंत अभ्यासू, शिस्तप्रिय, सकारात्मक दृष्टिकोन, सर्वसामान्य सह यांना मिसळून घेणारं हे व्यक्तिमत्व. निगडी प्राधिकरण येथील स्वातंत्र्यवीर सावरकर मंडळाच्या निसर्ग मित्र विभागाचा अध्यक्ष, घोरवडेश्वर येथील उजाड माळरानावर अनेक निसर्ग मित्रांच्या खडतर प्रयत्नातून कातळातून वनराई फुलवली. हजारो स्थानिक झाडे लावून जगवलेली. आणि हे काम अथकरीत्या वीस वर्षे चालू आहे.

याच विभागाच्या माध्यमातून अनेक निसर्गविषयक व्याख्याने, भटकंती कट्टे, निसर्ग व्याख्यानमाला, लहान मुलांसाठी किल्ले बनवणे स्पर्धा, नदी स्पर्धा असे अनेक उपक्रम त्यांच्या नेतृत्वाखाली घेतले जातात. हळूहळू क्षेत्र विस्तारत देवराई ट्रस्टच्या माध्यमातून

शेडबाळे यांच्या जन्म वेळी अवतीभवती असणाऱ्या भक्तजनांच्या मुखी संत तुकारामांचा वृक्षवल्ली आम्हा सोयरे वनचरे या अभंगाचे शब्द रुंजी घालत असावे. झाडांची पाने झाडावरून भिरभिरत अंगावर पडून न्हाहू माखू घालत असावी. फुलांच्या सुगंधाचा दरवळ त्यांना आकर्षित करत असेल. मनशांतीला प्रत्येक झाड हेलकावे देत शितलता देत असतील. आणि त्यातूनच कदाचित मनात जोपासलेली निसर्गाच्या हिरवाईची सेवा उतणार नाही मातणार नाही , घेतला वसा टाकणार नाही या भावनेशी एकरूप होऊन निसर्गाचा वारकरी या नात्याने त्यांनी कर्तव्याला व कर्तुत्वाला साधनेची जोड दिली.

महाराष्ट्रामध्ये अनेक ठिकाणी देवराई उभारण्यासाठी प्रयत्न केले. त्याला लागणारी रोपे त्याच विभागात मिळावी, वाहतुकीचा खर्च वाचावा आणि स्थानिकांना रोजगार म्हणून त्या परिसरात रोपवाटिका ही सुरू केल्या. त्या रोपवाटिकेतील रोपांची विक्रीची हमी घेऊन त्यांना लागणाऱ्या बिया मिळवण्यासाठी त्यांचे दरवर्षी कलेक्शन चालू असते.

नाम फाउंडेशनचे काम असो की अविनाश पोळ यांच्याबरोबर आमिर खानच्या पाणी फाउंडेशनचे काम, सह्याद्री देवराईचे काम असे सगळीकडे स्वतःच्या नावाची प्रसिद्धी न करता तळमळीने काम करत आहेत. या कामामधूनच नाना पाटेकर, सयाजी शिंदे, जॅकी श्रॉफ यासारख्या अभिनेत्याबरोबर जवळचा संबंध तयार झाला आहे.

अत्यंत प्रामाणिक, आणि कुठलेही काम आपलेपणाने करण्याचे मोठेपण, जीवनाच्या सर्व बाजू सहृदयतेने करण्याच्या कौशल्यात आहे. तो एकांगी प्रचारक नाही. तो सर्वस्वर्शी सत्य पूजक आहे. निसर्गाशी वैर करून, हृदय पायाखाली तुडवून,



मनुष्य सुखी होत नाही. मनुष्याचे जीवन ही एक नाजूक वेल आहे. आयुष्याची सुखे ही त्या वेलीवर उमलणारी चिमुकली फुले आहेत. भावनांच्या शीतल जलावाचून ही वेल फुलत नाही. नुसत्या बुद्धीच्या उन्हाने त्या सुकून जातात.

सुख निरपेक्ष सेवेत आहे. सुख जीव देणाऱ्या माणसात आहे. वरील सर्व विचारधारा ज्या व्यक्तीच्या नसानसात भिनलेल्या आहे ,आणि आपल्या अष्टपैलूत्व व्यक्तिमत्वाने प्रत्येकाला कर्तुत्वाची संजीवनी देण्यात यशस्वी झाले आहे त्या व्यक्तीचे नाव धनंजय शेडबाळे. प्रत्येक कार्यकर्त्याच्या मनात आपल प्रेम,आपलेपणा, प्रत्येकाचे ऐकून घेण्याची भावना, आणि प्रत्येकाचे विचार स्वीकारण्याची क्षमता यातून त्यांनी प्रत्येकाच्या मनात सेवा आणि प्रीती खोलवर रुजवली आहे हे निश्चित. सेवा जग फुलवते आणि प्रीती मन खुलवते. काही माणसे जन्माला आल्यानंतर स्व जगण्याचा हिशोब करत असताना अश्रूंचे मोजमाप करताना दुसऱ्यांच्या मदतीसाठी काही करता येईल का यासाठी धडपडत असतात. अशा माणसांना दातृत्व अथवा मदत यासारखे शब्द कुठल्याही शब्दकोशात पहावे लागत नाही. हे शब्द त्यांच्या अवतीभवती रुंजी घालत असतात. त्यांना त्याची चाहूल लागण्या आधीच ते कार्य नकळत पूर्णत्वाला गेलेले असते. धनंजय शेडबोळे नेमके यामध्येच सामावलेले आहेत. ताम्हिणी आणि कोकण क्षेत्रात छोटे बंधारे आणि बांधून देणे, अनेक संस्थांना, व्यक्तींना आर्थिक मदत करणे, संभाजीनगर येथील जन सहयोग संस्थेला मदतीसाठी मागितलेले एखादे वाहन कायमचे प्रदान करण `( वाहनाचे नाव ग्रीन एक्सप्रेस) असली काम त्यांच्या हातून नकळत होऊन जातात. खिसे भरण्या पेक्षा ते रिते करण्यावर त्यांची बहुमोल श्रद्धा आहे. सरते शेवटी हे निष्पन्न झाले आहे की या व्यक्ती वरती जेवढे लिहीले जाईल ते कमीच ठरणार आहे एवढी मोठी त्यांच्या कामाची व्याप्ती आहे. शेडबाळे माणसं वाचत असताना ते उघडून पाहण्यापेक्षा उलगडून पाहतात. वरदळीपेक्षा वर्तनातील चांगल्या माणसांचा राबता त्यांचे भोवती असतो.

निसर्गासह जेव्हा ते जुन्या मित्रासह आपल्यात मिसळतात तेव्हा प्रत्येकाचे बालपण पुन्हा नव्याने भेटायला आल्यासारखे वाटते. नवनिर्मितीचा ध्यास घेतलेले हे व्यक्तिमत्व ट्रेकिंगचा छंद जोपासतात. निसर्गातील वाहता मळा न्याहाळताना गाण्यांच्या माध्यमातून गाता गळा सदैव चालू असतो. तो एक प्रकारचा रियाज असावा. यांच्यासारखे चेहरे सहकार्याने नातं जोडून सदकार्याची वात तेवत ठेवतात निसर्गाचा हा छंद जोपासणाऱ्या धनंजय या अवलिया व्यक्तीसाठी. लेखाच्या शेवटी मोहम्मद रफी यांच्या मराठीतील गीताची ओळ आठवते--- हा छंद जीवाला लावी पिसे.

मधुकर (अण्णा) वैद्य. ९८८१२४२८५६

# किल्ला

इतिहासाचा
गाठण्या पल्ला
अंगणात बांधला
मस्त  किल्ला

घमेली, फावडी
विटा नि माती
मोहरीची पेरली
हिरवी शेती

बुरुज पायवाट
बेलाघ कडे
पायथ्याला देवाचे
दर्शन घडे

माची ,तटबंदी
छोटेसे तळे
ढाल, तलवारीत
सज्ज मावळे

अजून मनावर
पडलंय गारुड
राजबिंडे महाराज
सिंहासन आरूढ

रायगड, प्रतापगड
कुणी शिवनेरी बांधला
इतिहासाशी दुवा
अचूक सांधला

तानाजी, येसाजी
इथेच राहतात
त्यांच्या शौर्याची
गाणी गातात

पाहून जो तो
इतिहासात जातो
अजून कंठ
 दाटून येतो

श्रीनिवास गडकरी
रोहा   पेण     पुणे
९१३०८६१३९४



# दिवाळीतला किल्ला लेख

नीता चंद्रकांत कुलकर्णी पुणे

झाली एकदाची सहामाहीची परीक्षा... अभ्यासातून पोरं मुक्त झाली .आता दिवाळीची सुट्टी सुरू.. पण पोरांना खरे वेध लागले होते ते किल्ला बनवण्याचे...

तशी त्यांची चर्चा आधीच सुरू झाली होती. शेवटचा पेपर झाला की संध्याकाळी सोसायटीतल्या पोरांची सगळी गँग खाली जमली. चवथी.. पाचवीतल्या छोट्या मावळ्यांबरोबर नववीतले दोन सेनापती.... दादा होते.

दगड, विटा ,माती कुठून कशी कोणी आणायची याची खलबतं सुरू झाली. मुख्य लागणार होत्या विटा...

मागच्या गल्लीत एका इमारतीचे काम सुरू होते .मग त्यातल्या त्यात साध्याभोळ्या दिसणाऱ्या आणि गोड बोलणाऱ्या दोन पोरांना या कामगिरीवर पाठवण्यात आले.

ते दोघे अदबीने जाऊन तिथल्या सुपरवायझरच्या समोर उभे राहिले. आणि म्हणाले,

" काका एक रिक्वेस्ट होती. आम्हाला दिवाळीतल्या किल्ल्यासाठी विटा हव्या आहेत .मिळतील का ? दिवाळीनंतर आम्ही परत करतो."

काकांना हसू आले. ते गावाकडून आलेले होते.. म्हणाले ,

" देतो की.. पण अरे आता मातीच्या विटा नाहीत.. या सिमेंटच्या जड आहेत .त्या तुम्ही कशा नेणार ?

" काका ते आम्ही बघतो."

" तुम्हाला जमतय का न्यायला ....मग द्या या दहा-बारा विटा ."

कामगिरी फत्ते...

मुलं खुश. सायकली आणल्या ... कॅरिअरवर दोन दोन विटा घेऊन आले. आसपास मिळतील तिथून दगड... किल्ल्याच्या बांधकामासाठी येत होते. छोट्या मावळ्यांना माती आणायला पाठवले जात होते. कोणी घरातून पोती आणली होती. तोपर्यंत अंधार पडायला लागला.

आयांच्या हाका सुरू झाल्या..

मातीने बरबटलेले शर्ट पॅन्ट ...

पोरं घरी गेली .

दुसरे दिवशी सकाळीच गँग परत खाली हजर .

दोन्ही दादांनी पन्हाळा किल्ल्याचा अभ्यास केला होता. यावेळेस तोच करायचा ठरला.

दादांच्या मार्गदर्शनाखाली बांधकाम सुरू झाले . महाराजांचे सिंहासन तयार झाले. गडावर विहीर करणं अवघड व्हायला लागल्यावर पायथ्यालाच विहीर केली गेली.

मध्येच दोन चार जणांची भांडण सुरू झाली . त्यांच्यात समझौता केला गेला .

" खरं तर लाल मातीच्या चार विटा हव्या होत्या " असं दादा म्हणाला.

मग दोघांनी.. न विचारता शेजारच्या बागेतून विटा चोरून आणल्या.

" चोरी करणं पाप आहे. महाराजांना असे वागणे कधी आवडले नसते." असं सांगून दादानी चोरून आणलेल्या विटा परत करायला लावल्या.. त्या दोन मुलांना रडू च आले....

पायऱ्या करताना अडचणी येत होत्या. तहानभूक विसरून पोरं कामं करत होती.

बऱ्याच विचारांनंतर तोफेची जागा ठरली . दोन वाघ होते त्यांच्यासाठी गुहा करण्यात आली.

किल्ला लवकर झाला तर अळीव पेरता येतील म्हणजे नॅचरल लुक येईल म्हणून दोन दिवस पोरं सतत कामं करत होती.

दोन पोरींना किल्ल्याच्या डेकोरेशनची जबाबदारी देण्यात आली . त्यांनी हिरव्या कागदाची छान झाडं तयार केली. मोठी कमान किल्ल्याच्या दरवाजापाशी लावली.

गवळणी विहिरीजवळ ठेवल्या.

पोरींनी "पन्हाळगड "असं कार्डबोर्डवर सुरेख अक्षरात लिहून आणले .

किल्ल्याच्या नावाची पाटी तयार होती.... पण हा पन्हाळा वाटतोय की नाही हे कळत नव्हतं . दादाला आयडिया सुचली तो म्हणाला..

" किल्ला अंडर कन्स्ट्रक्शन आहे असं आपण सांगूयात .." .मग तसंच सांगायचं ठरलं ..

खाली गाव ,घरं, रस्ता, झाडं.. झुडपं भराभर तयार झाली. खरंतर मारुतीचं देऊळ करायचं होतं.. पण मारुती कोणाकडेच नव्हता .एक जण शंकराची छोटी मूर्ती घेऊन आला. ती मूर्ती डोंगरावर ठेवण्यात आली.

तटबंदी घालून झाली. पोरं आपणच केलेल्या किल्ल्याकडे कौतुकाने बघत होती. घराघरातून मातीची खेळणी आणली गेली. किल्ला सजवला गेला. डोळ्यात तेल घालून पहारा देणारे मावळे दोघांनी आणले होते.

" तुझ्यापेक्षा माझेच मावळे जास्ती शक्तिमान आहेत "

असा थोडा वाद त्यांच्यात निर्माण झाला .पण गडाच्या संरक्षणासाठी चारही मावळे ठेवावे असा निर्णय देण्यात आला.

" आपला किल्ला फार भारी झालेला आहे. डोळ्यात तेल घालून त्याचे रक्षण करा ." दादांनी बजावले किल्ल्याचे राखण करण्यासाठी दोन दोन तासांच्या बॅच ठरवण्यात आल्या.

आता किल्ला फायनली पूर्ण झाला होता.

दादानी शिवाजी महाराजांना त्यांच्या सिंहासनावर बसवले. सगळ्यांनी टाळ्या वाजवल्या.

इतिहासातही असेच घडले असेल....

शिवाजी महाराजांचे प्रेम...

तसेच त्यांची शिकवण मुलांच्या मनात जागृत करणारा हा ..... दिवाळीतला किल्ला बनवायला मुलांना प्रोत्साहन द्या.

कारण तो नुसता किल्ला नव्हता. त्यातून मुलं खूप काही शिकत होती. नियोजन ,एकता , आपापसातली मैत्री,प्रेरणा, काही वेळेस माघार घेणं, श्रमाची ,कष्टची जाणीव आणि अजून खूप काही .... यातुनच त्यांना आयुष्यभर उपयोगी पडणारे शिक्षण त्यांना मिळत असते.

मुलांना मातीत चिखलात खेळू दे
शिवरायांकडून थोडी स्फूर्ती घेऊ दे
आवडीचा किल्ला बनवू दे
महाराजांचा जयजयकार करू दे..
तुम्हीही म्हणा...
" छत्रपती शिवाजी महाराज की जय"

नीता चंद्रकांत कुलकर्णी पुणे
९७६३६३१२५५



आत्मा त्याचा बाभळीवरुन
हळूच खाली उतरला
भरपाई घेऊनआलेल्याअधिका-याला
हप्ता त्यांने हळूच हातात दिला....

अधिकारी थोडा घाबरला
मग थोडा सावरला..
प्रेताच्या टाळूवरचे
खाण्याची सवय होती त्याला

बाईल त्याची बांधावर
भेदरलेली उभी...
एक पोर खांद्यावर
एक कडोसरीला
एक पोटामधी

सरपंच तिला घेऊन
अधिका-याकडे गेले
कागदावर तिचा अंगठा उठवला
त्यांनीच मग नोटा घेऊन
आपला हिशोब केला

चावडी वर सारा जुमला भेटला
रातीचा सारा बेत थाटला
बाई बिचारी भेदरलेली
उमजेना काही उमेद संपली
रात सरली पहाट झाली
रिकामा लिफाफा...
घेऊन घरला आली

सावकाराने पैशाची मागणी केली

संपलं सारं बाई संपली
विहीर रात्री जवळ केली
पोटाला पोरं होती बिलगली

तळाशी मऊशार मातीने
अलगद कुशीत झेलले
विहीरीत चि-यांमधून थेंब
झिरपत होते हळुवार...

पुरुषोत्तम

पुरुषोत्तम इंगळे

# मित्रपुस्तक

खूप गुण देतोच
मैत्र राखतो
धुळीत रेंगाळतो
चिडत नाही कधी।

किती पूस्तके
संग्रही असतात
काही तक्रार
नाही करत कधी
चुपचाप पडून।

धूळ साठते
कधी फटका बसे
बिचारे शांत
मुक,बधिर होत
तरी ज्ञान देतच।

हेळसांडही
होते ना कधीतरी
सहनशील
न्याल तेथे सोबत
कुठला हट्ट नाही।

मोबाईलच्या
युगात वेळ कुठे
वाचायलाही
नुसती कपाटात
वाळवी विळख्यात।

अनघा कुलकर्णी,लोहगाव



# वंशाला दिवा

दोन महिन्याच्या बाळाला अंगावर पाजून हौसाने बाळाला झोळीत टाकले. मोठ्या पोरीला कमळाला झोका द्यायला सांगून ती भाकरी थापायला भिडली होती. सकाळपासून रानात गेलेल्या येवाजीची न्याहरीची वेळ झाल्याने तिला आवरायची घाई झाली होती. आईने बाळाला झोपवयला सांगितलेले कमळाच्या चांगले जीवावर आले होते. शाळेला सुट्टी असल्याने तिला बाहेर हुंदडण्याची घाई झाली होती. झोळीतले पोर झोपत नसल्याचे पाहून कमळा जोरजोरात हिसके भरून झोळी खाली वर करत होती. जोरजोरात झोके भरणाऱ्या कमळाला पाहून हौसा चांगलीच डाफरली होती.

ङ्कमे आ वं हळूच दे वं झोका आं काय कुटं मराय जायाचा हाय का वं तुलं ,जरजर हाळूच दे वं झोका" कमळाला सांगुन हौसाने चुलीत लाकूड घूसळून जाळ वाढवला नि पुन्हा भाकरीच्या कामाला भिडली. झोका देऊनही झोळीतले बाळ झोपायचे नाव घेत नसल्याचे पाहून कमळाच्या कपाळावर आठ्यांनी जाळे धरले होते. झोळीत रडणाऱ्या बाळाला पाहून ती जेरीस आली होती. दारात उभ्या जोडीदरर्णींना पाहून वैतागलेली कमळा आईला म्हणाली,

"आये पोशा नाय निजं पहाय वं, पाजूनपिजून तरी देजोस वं त्यालंङ्ग बाहेर हुंदडण्यासाठी घाई झालेल्या नि झोळी देण्यासाठी टाळाटाळ करर्णाया पोरीवर हौसा चांगलीच भडकली. शेजारी जेवयला बसलेल्या लहानग्या सुशिलाच्या ताटात भाकर मोडून देत ती खेकसून कमळाला म्हणाली,

ङ्गहोडाक रहलाय झोपव तावं, तुझा दादा येईलच आता रानातून, भाकरतुकडा करून देस मालं, मग जाय कोकडं जायाचा तहां दिवसभर हुंदडायङ्ग

कमळाला सांगून हौसा भाकरी करण्यात गुंतली. झोळीतल्या पोराने रडून घर डोक्यावर घेतलेले पाहून कमळा संतापली होती. दारात उभ्या जोडीदारीर्णींना पाहून तर तिच्या संतापाचा कडेलोट झाला होता. झोळीतल्या बाळाला लवकर झोपवण्याच्या विचाराने कमळा झोळीला वेग भरू लागली. नि रागारागात झोळीला हिसके देऊन ती झोळीला खाली वर करू लागली. चूलीजवळ हौसा भाकरी करण्यात गुंतली असतांनाच कमळाने वेगासरशी झोळीला वर आढ्याला भिडवली होती. पोराला झोपवण्याच्या नादात घात झाला नि डोळ्याची पापणी लवायच्या आत झोळी उलटी होताच खाली आली. हौसाचं कोवळं लेकरू काही कळायच्या आत झोळीतून निसटून खाली आलं नि भुईवर कोसळून रक्ताने न्हाऊन निघालं.

झोळी उलटी होऊन कोसळलेल्या लेकराला पाहून चूलीजवळ भाकरी थापणारी हौसा थरथरली. तिच्या अंगावरून वारं गेलं नि रक्ताने भरलेलं बाळ पाहून तिला भोवळ येऊ लागली. आईच्या हातून आता आपण ठार मरणार या भितीने कमळाने खोपटाबाहेर धूम ठोकली. बाहेर पळर्णाया लेकीला पाहताच हौसाच्या तळपायाची आग मस्तकाला गेली नि ती पिसाळून उठली. कमळापायी लेकरू मरून पडलं या विचाराने पेटलेली हौसा पदर खोवून तावातावात खोपटाबाहेर पडून कमळाच्या मागे धावू लागली. हरणावानी उडाण घेऊन धावणारी पोर हातात येत नसल्याचे पाहून हौसा पेटून उठली नि ती रागाने शिवी हासडीत कमळाला म्हणाली,

"तुहा सपाटा झाला वं कुत्रे, कोठंवर पळिशल

तु आं थांबजोस तुझा तर आता जीवच घेतु वं मी.कमळे थांब पळजोस नको..थांब थांब!!"

कमळाच्या मागे लाकूड घेऊन धावर्णाया हौसाने ओरडून आंथरूणातच गलका केला होता. मोठ्या लेकीच्या मागे धावणारी हौसा झोपेत अर्ध्या रात्री गाव जागा केल्यागत बडबडत होती. बायकोने केलेल्या हलकल्लोळाने शेजारी झोपलेला येवाजी आंथरूणात उठून बसला होता. झोपेत बरमळर्णाया बायकोच्या अंगाला गदगदा हलवत येवाजी म्हणाला,

ङ्कअय हौशे काय वं झालाय तुलं आरडाय होडाक राती, ये बये उठती का आता?ङ्क नर्वयाचे शब्द कानावर पडताच आंथरूणात कानी पडलेली हौसा भानावर आली होती. मांजरीवानी डोळे बारीक करून ती समोर आंथरूणात बसलेल्या नर्वयाला पाहू लागली. झोपेचे खोबरे झालेल्या येवाजीने पिसाळल्यागत हौसाला विचारले,

ङ्ककाय झाला वं हौसे आरडाय तुलं, अन कोणाचा वं तु सपाटा करून रहलीय होडाक राती? आं येड्फ फट कुणीकडची गप झोपङ्क येवाजीच्या ओरडण्याने घामागिरदी झालेल्या हौसाची भंबेरी उडाली नि हौसा नवऱ्याचे बोलणे ऐकून साप सुंगल्यावानी गप्प पडून राहिली. डोळे वासलेल्या येवाजीला चेहरा गंभिर करून हौसा म्हणाली,

"नाय काय झाला वं झोपा तुम्ही"

"अन मग काय ईर्रर्बिहं आरडतीय येड्यावानी होडाक राती? तुझ्या आयचे तुझ्ये त झोप आता मुक्याट्यानी" बायकोला शिव्या हासडून येवाजी एका कानी होऊन आंथरूणात आडवा झाला.

झोपेत पडलेल्या विचित्र स्वप्नाने हौसा घामघुम झाली नि ती भयाने चळाचळा कापू लागली. घशाला कोरड पडलेली हौसा जीव घाबरा होऊन आंथरूणात उठून बसली. अर्ध्या नजरेने ती बसल्या जागेवरून खोपटाला न्याहाळू लागली. घटकाभरापूर्वी स्वप्नात पाहिलेली धगधगती चूल तिला आता शांत दिसत होती. खोपटातला दिवा त्याच्या जागी ढणढणत होता. कुडाजवळ झोपलेली सासु मथुरा शांत निजलेली हौसाला दिसत होती. मथुरा आईच्या पुढ्यात छातीशी गुडघे घेऊन झोपलेल्या कमळाला पाहताच हौसा गर्भगळीत झाली. झोपेत पडलेल्या स्वप्नाचा एकेक पट तिच्या नजरेसमोरून अलगद सरकू लागला. झोळीतून कोसळलेल्या बाळाची आठवण होताच हौसा भांबावून गेली नि ती सैरभैर नजरेने आपल्या ओटीपोटाला चाचपुन पाहू लागली. पोटातला गोळा जागेवर सुरक्षित असल्याचे लक्षात येताच तिला आनंदाचं भरतं आलं होतं. एखाद्या उजाड रानावर पावसाच्या सरींनी अचानक वर्षाव करावा तद्वत हौसा आनंदाच्या सरींनी न्हाऊन निघाली.

वादळात हरवलेली नाव तिराला लागावी तशी हौसा वास्तवाला जवळ करू लागली. पाणी पिऊन निवांत झोपावे या विचाराने ती माठाजवळ आली होती. माठातून तांब्याभर पाणी घेत हौसा घसा ओला करू लागली. स्वप्न होतं म्हणून बरं नाहीतर नर्वयाने आपला जीवच घेतला असता या विचारांच्या तंद्रीने हौसाच्या हातातून पाण्याचा तांब्या एकाएकी निसटला. तांब्याच्या आवाजाने कुडाला झोपलेल्या मथुरा आईला जाग येताच ती माठाजवळ उभ्या पोटूशी सुनेला पाहू लागली.

ङ्ककाय वं हौशे, काय करून रहलीय तठं होडाक राती, अन अंधारात वं काय झालाय तुलं तठं कलमडाय?" मथुरा आईने काळजीने हौसाला विचारले. मथुराच्या आवाजाने हौसाला कापरे सुटले नि तोंडात पदर दाबून पडलेल्या तांब्याला पाहू लागली. सुन काहीच बोलत नसल्याचे पाहून मथुराने आंथरूण सोडले. माठाजवळ उभ्या हौसाजवळ येत तिने खाली पडलेला तांब्या उचलून माठावर ठेऊन दिला. भांबावलेल्या पोटूशी सुनेला घेऊन ती आंथरूणाकडे नेऊ लागली. मथुरा आईच्या जीर्ण हाताच्या स्पर्शाने हौसाला भरून आले होते. आज किती तरी

दिवसांनी तो मायेचा स्पर्श ती अनुभवत होती. "काय नाय वं आत्याबाय पाणी पियालं आलतु तांव, घशाला जाम कोरड पडली व्हती वं माझ्ये" हौसा चालता चालता सासुला म्हणाली. "आवं हौशे मग मालं उठवायचा नायतर कमीलं हाक मारायची ना वं, आं पोरगे पोटूशी बाईनं असाक उठना बरा नाय?" सांगुन मथुराने हौसाला आंथरूणावर आणले. "नाय काही झोपा तुमी आत्याबाय, आहू मी बरी काही लागला हूआ त जाब देतु तुलं" मथुराला झोपायला जाण्यासाठी सांगून हौसाने आंथरूणावर अंग टाकले. पोटुशी सुनेने रात्री अपरात्री एकटे उठणे ठिक नाही या काळजीने आंथरूणाकडे जाता जाता मथुरा म्हणाली, "बरा बरा काही तरास तर नाय ना वं कळिबळ, अन तसाक काही वाटला तर जाब देजोस मालं हौवं" "आखु नाय तसा काहीच आत्याबाय झोपा तुम्ही निवांत" हौसा उत्तरली. मथुरा आई कुडाला घातलेल्या आंथरूणावर येऊन आडवी झाली होती. पोटूशी असलेल्या हौसाचे दिवस भरत आल्याने ती काळजी करत होती. सासुला झोपायला सांगुन हौसा झोपायची तयारी करू लागली. पडलेल्या स्वप्नाने तिचे मन बेचैन होऊन वाट चुकलेल्या वासरागत सैरभैर झाले होते. दोन्ही हातांना भार घालत हौसा आंथरूणावर कानी होऊन समोर झोपलेल्या लहानग्या पोरीला सुशीलाला पाहू लागली. लहानग्या सुशिलाला न्याहाळतांना तिच्या डोळ्यांना पाण्याची धार लागली. मुलीचा निरागस चेहरा पाहता पाहता हौसा भूतकाळाच्या अथांग प्रवाहात डोकावली.

कार्तिक महिना येताच तुळशीची लग्नं लागली नि मोठ्या आंबाडच्या रामदासाची हौसा आणि मथुराच्या लेकाच्या डोक्यावर तांदूळ पडले. मोठ्या आंबाड गावात राहणार्या भावाच्या पोरीला सुन करून मथुरा आईचं घोडं गंगेत न्हाहलं होतं. शर्यतीसाठी गावभर बुरकळणार्या येवाजीचे दोनाचे चार हात करून तिचे काळीज सुपाएवढं झाले होते. भावाचीच पोर मनासारखी सून म्हणून मिळाली या विचाराने ती आनंदाने भिजून गेली. नव्या सुनेचे कौतुक करतांना मथुरा आईची जीभ दमत नव्हती. आईला पोरकी असलेली हौसा संसारात रमली आणि सासुच्या मिळालेल्या प्रेमाने ती गुण्यागोविंदाने नांदू लागली. सुना-मुलाचा फुललेला संसार पाहून मथुराला नातवाचं तोंड पाहण्याची घाई झाली होती. आपल्या घराला वंश मिळावा यासाठी ती देवाला साकडू घालू लागली. रात्रीपाठी दिवस पळाले नि थोड्याच दिवसात हौसाला दिवस गेले. येवाजीच्या संसाराला नवी पालवी फुटल्याचे पाहून मथुरा आई पोटुशी सुनाचे सगळे करू लागली. अंगणात नातू खेळणार या आशेने मथुराला गगन ठेंगणं वाटू लागलं. पोटुशी सुनेच्या काळजीने मथुराने पहिल्या बाळंतपणाला हौसाला माहेरी न पाठवता तिचे सगळे घरीच केले होते. हौसाचे दिवस भरले नि ती बाळंतीण होताच मथुरा आईचे नातू पाहण्याचे स्वप्न क्षणात भंगुन गेले. हौसाने मुलीला जन्म दिलेला पाहून मथुराच्या तोंडचे पाणी पळाले होते.

सुनेला तळहातावरल्या फोडावानी जपणारी मथुरा थोड्याच दिवसात हौसाची हाडहाड करू लागली. पदरात नातू न दिल्याने मथुरा आई तिला पाण्यात पाहू लागली. वंशाला दिवा न दिलेल्या हौसाला मायलेकांकडून सासरवास सुरू झाला. काळ पुढे सरकू लागला नि हौसा दु:खाच्या गर्तेत सापडताच उन्मळून पडू लागली. दिवसामागून आठवडे पळाले नि आठवड्यामागून महिने निघाले. दुर्दवाने हौसाची पाठ सोडली नाही तोच काही दिवसातच जीव लावणारा तिचा बाप टिबी रोगाने मरून देवाघरी गेला. मोठ्या आंबाडच्या गावात माहेरी तिचे आता कोणीच उरले नव्हते. हौसाच्या संसाराला लवकरच उतरती

कळा येऊ लागली. अंगणात बाळ रांगावं म्हणून तिला सासुकडून उपासतापास सुरू झाले. अंगानी आधीच नाजूक असलेली हौसा थोड्याच दिवसात बाभळीच्या लाकडावानी सुकून गेली. महिन्यांमागून महिने पळाले नि हौसाची मोठी पोर कमळा दिड वर्षाची होत नाही तोच हौसा दुर्सया बाळंतपणाला आली. या खेपेला तरी नातू होईल या आशेने मथुरा आई सुनेचे सगळं करू लागली. हौसाच्या दुर्दवाने पुन्हा डोके वर काढले आणि दुर्सया बाळंतपणात तिला लवकर कळा सुरू झाल्या. कमी दिवसाचं हौसाचं पोर तिच्या पोटातच मरून गेलं. पोटात मेलेलं बाळ हा मुलगाच होता या अविचाराने मथुरा आणि येवाजी दोघे मायलेकं हौसावर पेटून उठले होते. कमनशिबी सून मिळाल्याचा राग मनात धरून मथुरा सुनेला हिडीसपिडीस करू लागली. पोर पोटात मेल्याचे पाहून हौसा कोसळली होती नि तिची संसार करण्याची रयाच निघून गेली होती. हौसाच्या अंगात जीव असूनही ती एखाद्या निर्जिव दगडावानी आला दिवस कंठीत होती.

चैत्राला पालवी फुटावी तद्वत हौसा पुन्हा बाळंतपणाला आली नि तिर्सया बाळंतपणाला तिच्या पदरात सुशिला पडली. सुशिलाच्या जन्मानंतर हौसाच्या आयुष्यात सुखाने पाठच फिरवली. अश्रुंचे घोट पिऊन ती आला दिवस रेटू लागली. ओठांवर खोटे हास्य नि अंतरी आक्रोश ठेऊन हौसा जगू लागली. आपलं आता या जगात कोणीच उरलं नाही या विचाराने ती अंधारात स्वतःचे तोंड बडवून घेत सुटली. दिवसा पाठी रात्र आणि रात्री पाठी दिवस ही काळाची दौड सुरू असतांना आठवड्यामागून महिने पळाले नि महिन्यांची गोळाबेरीज होऊन हौसाच्या तिसऱ्या बाळंतपणाला दिड वर्ष पूर्ण झाले. काळाच्या उमलत्या नियमाने ती चौथ्यांदा बाळंतपणाला आली होती. घटकाभरापूर्वी पडलेल्या विचित्र स्वप्नाने हौसा आंथरूणातच गर्भगळीत होऊन पडून होती. ओटीपोटाला चाचपून पाहिल्यानंतर पोटातला गोळा जागेवर ठिक असल्याचे पाहून तिच्या मनाला आनंदाचं भरतं आलं होतं. आंथरूणात जवळ झोपलेल्या लहानग्या सुशिलाच्या तोंडावरून हात फिरवून हौसा कुशीवर वळणार तोच.

आंथरूणात एका कानीवरून दुर्सया कानी हौसा कुस बदलणार तेवढ्यात हौसाच्या पोटात जोराची कळ उठली नि ती एकाएकी ओरडून उठली. हौसाच्या ओरडण्याने नुकताच डोळा लागलेला येवाजी चवताळून उठला आणि आंथरूणात विव्हळर्णाया बायकोवर तो ऊर भरू लागला.

ङ्गकाय वं हौशे काय झाला वं तुलं आखु आरडाय? खरीहून सांगजोस वं पोरगे मालं निजून द्यायचा हाय का नाय वं तुलं?" हौसावर आग ओकत येवाजी म्हणाला.

"आवं माझा पोट पोट..आई गं..ये देवा.आ आ." हौसा आंथरूणात विव्हळत असल्याचे पाहून येवाजीची मती गुंग झाली. बायकोचे ओरडणे पहिल्यापेक्षा निराळे वाटू लागल्याने त्याच्या पायाखालची जमिन सरकू लागली. ओटीपोटाला दोन्ही हातांनी दाबून आकांत मांडणाऱ्या बायकोला पाहून येवाजीची भंबेरी उडाली नि तो सैरभैर नजरेने हौसाला पाहू लागला. हौसाचे हाल पाहून येवाजीने कुडाजवळ झोपलेल्या आईकडे धाव घेतली नि तो तिला उठवू लागला. मथुरा आईच्या अंगाला गदागदा हलवून येवाजी म्हणाला,

"आवं आये उठं वं, ही पहाय ना हौशी कसाक वं करून रहलीय?" येवाजीच्या आवाजाने मथुरा आई खडबडून जागी झाली नि अर्ध्या डोळ्यांनी जवळ बसलेल्या मुलाकडे पाहून डोळे चोळीत विचारू लागली. "कायरंपोशाकायरंकायझालायतुलंअनतुझ्येबायकुसलं आरडाय होडाक राती?" मथुरा आईने विचारले.

"मालं पण वं काय समजस नाय, पहाय वं

ती कसाक ज करून रहलीय तठं>” चुलीजवळ आंथरूणात वेदनेने विव्हळनाऱ्या हौसाकडे बोट दाखवित येवाजी म्हणाला. ओटीपोटाला धरून गडबडा लोळणाऱ्या सुनेला पाहून मथुराचे धाबे दणाणले. विजेच्या चपळाईने तिने आंथरूण सोडले नि ती सुनेजवळ येऊन तिला आधार देऊ लागली. हौसाचे दिवस भरत आल्याने ती प्रसव कळांनी विव्हळत असल्याची खात्री मथुराला झाली होती. येवाजीला जवळ बोलवत मथुरा आई म्हणाली,

“येवाज्या आरं पोश्या, तु पटक्यान वरल्या आळीलं जाऊन काशी डोशीसलं बलवून आणजोस, घाय कर पोरा पळ पटक्यान तांव”

मथुरा आईने सांगताच येवाजी घाई गडबड करून उठला नि हरणाच्या दौडीने बॅटरी झाडीत तो घाई करू लागला. काशी म्हातारी ही गावातली चांगली सुईण असल्याने तिला घेण्यासाठी वरच्या आळीला धावत सुटला. काशी म्हातारी येईपर्यंत पाणी तापवून ठेवण्याच्या विचाराने मथुरा आई चुलीत लाकडं घुसळून जाळ करू लागली. चूल्यावर पाण्याचे आंदण ठेऊन मथुराने आपल्या जोडी शेजारची पारू डोशी आणि चिमणाबाईला बोलवून घेतले. एकाला जोडी आयत्याभली दोघी तिघी या विचाराने साऱ्या जणी मिळून पोटुशीला मोकळं करणार होत्या. काशी डोशीला खोपटात पाठवून येवाजी बाहेर आंब्याच्या झाडाखाली आला नि बायकोच्या काळजीने येरझाऱ्या घालू लागला. येवाजीला जोडी असलेला चंदर जोपळा आणि लहू धुळा दोघेही त्याला आधार देत होते. हौसाच्या प्रसव कळांनी त्या निम्म्या रात्री येवाजीचं खोपटं गदगदा हालून एक झाले होते.

येवाजीने बोलवून आणलेली काशी सुईण आणि बाकी साऱ्याजणी खोपटात उद्योगाला भिडल्या होत्या. काशी म्हातारीने हौसाच्या ओटीपोटावरून हात फिरवून पाहिलं आणि तिच्या पोटावर तेल सोडून हलक्या हाताने चोळू लागली. काशी डोशीला जोडी चिमणा आई हौसाच्या ओटीपोटावरून खाली मांड्याकडे हलक्या हाताने मळू लागली. हौसाला कळ मारायला सांगुन ती खाली जोर घ्यायला सांगू लागली. वेणा देऊन अंगातली ताकद एकवटून हौसा जोर लावत सुटली. आपल्या जीवाला पाखडीत ती प्रसव कळांनी विव्हळत गर्भाला खाली घेऊ लागली. पायाखालच्या टाचा घासून हौसा पायाखालच्या गोधडीला दूर फैलावू लागली. दोन्ही हाताच्या घट्ट मूठी आवळून ती ओटीपोटाला जोर घेत होती. मथुरा आई सुनेच्या उशाला बसून तिच्या तोंडावरचा घाम पदराने टिपत होती. हौसाच्या जीवाची तगमग पाहून तिला थोडसं पाणी पाजतांना तिच्या जीवाची घालमेल होत होती. मोकळं होण्यासाठी हौसाचा जीव माशावानी तरफडत होता नि कळांनी तिच्या घशाला कोरड पडत होती. सुनेच्या काळजीने घाबरी होऊन मथुरा आईचा जीव टांगणीला लागला होता.

तीन तीन बाळंतपणं घालणाऱ्या हौसाच्या अंगातली ताकद पिरगाटून निघू लागली नि वेणा देऊन तिचे तोंड पांढरे फटफटीत पडू लागले. वेणा देतांना अंग सबकून निघताच हौसा आर्त किंकाळी घालून ओरडत सुटली. बराच वेळ होऊनही हौसा मोकळे व्हायचे नाव घेईना. ङ्कबायो जुरूक ज कळ काढजोसङ्क सांगून मथुरा आई हौसाची कंबर दाबता दाबता मधूनच तिच्या मांड्या चोळू लागली. प्रसुतकळांनी खोपटं डोक्यावर घेतलेल्या पोटुशीमुळे खोपटातले सारे वातावरण तंग झाले होते. प्रसुतकळांनी हौसा घामाने थबकत थकून गेली होती. पोटातल्या बाळाला बाहेर ढकलण्यासाठी तिची शक्ती कमी पडू लागली. नि थोड्याच वेळात तिने आपले डोळे गरगर फिरवून पांढरे करून दिले. वेणा देऊन देऊन तिच्या अंगातली ताकद कमी पडून हौसा भोवळखाली जाऊ लागली. पोटुशी हौसाने जर डोळे

बंद केले तर तिच्या जीवाला धोका निर्माण होईल या विचाराने काशी डोशी हौसाला आधार देत म्हणाली,

ङ्गपोरगे आवं हौशे, हिंमत धर वं बायो, निजू नकुस वं डोळे झाकू नकू वं बायो, जुरूक जुरूक पोटाखलं जोर लावजोस पोरगे!"

"आं! आं!!" करीत आंथरूणात विव्हळणारी हौसा जवळ बसलेल्या काशी डोशीला उसन्या डोळ्यांनी पाहत होती. जवळ बसलेली काशी डोशी काय बोलते आहे हे भोवळखाली जाणणाऱ्या हौसाला उमगत नव्हते. पोटुशी बाईच्या अंगातली ताकद कमी पडत असल्याचे पाहून काशी डोशी चिंतेच्या भोवऱ्यात सापडली होती. आजवर केलेल्या बाळंपणात हौसाला मोकळं करण्यासाठी तिची कसोटी लागली होती. शेवटी हौसाच्या ओटीपोटावर तेल सोडून पोटातल्या गोळ्याचा तिने अदमास घेतला नि ती हबकून निघाली. हौसाचे सगळे करूनही तिच्या हाताला यश आलेले नव्हते. मथुरा आईच्या सुनेला आपण मोकळं करू शकणार नाही याची काशी डोशीला जाणीव होताच तिने पुढचे काम आवरते घेतले. नि काशी डोशी रडवान्या स्वराने मथुरा आईला म्हणाली,

"मथुरे नाय जमत वं आपल्यानी आता, खरहून वं जाम भंगलुय वं मी आज तर"

"काय वं डोशे काय वं झालाय नेमका नेमका सांगजोस?" काशी सुईणच्या बोलण्याची री ओढीत मथुराने काळजी करून विचारले.

"आवं मथुरे पोटातला गोळा पोटातच फिरून ज रहलाय, बाहेर पडाय त्यालं तोंडच गवसून नाय रहलाय" काशी म्हातारी पदराने घाम टिपत म्हणाली.

"आरं बाबो यो काय वं आता? आन होडाक काय वाढवा आखु" मथुरा डोक्याला हात लावत म्हणाली. मथुराच्या शेजारी बसलेली पारू आई काळजीत पडली नि ती कंप भरलेल्या स्वरात म्हणाली,

"काय वं डोशे आता वं काय करायचा?"

"आवं पारे काय करायचा काय इचारून रहलीय तु, घाय करून दवाखाना गाठावा लागल तांव, आपल्यानी आठं काईच व्हणार नाय ह्यो काम" काशी डोशी उत्तरली. हौसाच्या बाळंतपणापुढे काशी डोशीने हात टेकलेले पाहून मथुरा आईच्या अंगाची गाळण झाली. सुनेच्या काळजीने तिची वाचाच बसली होती. मथुरा घाईघाईने खोपटाबाहेर पडली. आंब्याच्या झाडाखाली दात टोकरीत बसलेल्या येवाजीजवळ येत मथुरा गंभिर स्वराने म्हणाली,

"पोशाओ! ईपरीत ज झालाय रं, पोर मोकळी व्हायचं नाव घेअय नाय, तहां अवघडच झालाय समदा समदा अन काय तर"

हौसा मोकळे होत नसल्याचे मथुरा आईचे बोलणे ऐकून येवाजीला भयाने कापरे सुटले नि तो बसल्या जागीच घामाघूम होऊ लागला. पोटुशी हौसाच्या काळजीने त्याचं काळीज धडधडू लागलं. मनाला अनेक विचारांच्या इंगळ्या डसल्याचा भास होऊन येवाजीने पडक्या स्वरात आईला विचारले,

"आयेकायवंकरायचाहोडाकराती, उपादजझालीयतांव"

लेकाच्या बोलण्याची री ओढत मथुरा येवाजीवर पिसाळून म्हणाली,

"आरं खुळ्या येवाज्या, आता जास्ती ईचार कराय येळ नाय, दवाखाना गाठावा लागल पोरा, होडाक टाईम नाय चावळ ज कराय अन डोका खाजवाय, ठरवा काई तरी अन करा सोय"

मथुरा आईच्या बोलण्याने दात टोकरीत बसलेला येवाजी, चंदर जोपळा आणि लहू धूळा तिघे जण एकमेकांच्या तोंडाकडे पाहू लागले. एवढ्या रात्री दोन कोसावर असलेल्या ननाशी गावातला सरकारी दवाखाना गाठायचा कसा या विचारांच्या भोवऱ्यात तिघे जण सापडले. हौसाच्या काळजीने येवाजीच्या डोक्यात अनेक मधमाशांनी घर करून बाजार उठवला होता.

रात्रीच्या वेळी पूर्वेला काळ्या ढगांनी गर्दी

केलेली दिसत होती. शेंदरी,गुलाबी,करड्या रंगाचे ढग काळेकुट्ट होऊन नभात घिरट्या घालीत होते. हौसाच्या प्रसुतकळांनी येवाजीचे खोपटे भर रात्री गंभिर होऊन कण्हत होते. मथुरा आईने सांगितल्याप्रमाणे पोटुशी हौसाला ननाशीच्या दवाखान्यात नेण्यासाठी येवाजीने जाणू पाटलाच्या बैलगाडीची सोय केली होती. खोपटासमोर येवाजीने बैलगाडीत जुंपताच लहू धुळाने गाडीत तनशीच्या दोन तीन पेंढ्या टाकून दिल्या. तनशीवर कांबळ नि गोदडीची वळकुंडी करून आंथरूण टाकली. सगळ्या गडी माणसांनी मिळून पोटुशीला बैलगाडीत अलगद टाकले. डोईवरचा पदर सावरून मथुरा आई हौसाच्या उशाशी तर तिच्या जोडी काशी डोशी हौसाच्या पोटाजवळ बसली होती. बैलांचे कासरे हातात घेऊन तयार येवाजीने बैलांच्या पाठीवर थाप देताच गाडी ननाशी गावाच्या दिशेने झोकावली.

येवाजी गाडी हाकतांना लांबसडक चाबकाचे फटकारे बैलांच्या पाठाणावर उडवू लागला. चाबकाच्या बसणाऱ्या फटक्यासरशी मुर्दाड पडलेली पाटलाची बैलं चारी पायांवर उडाण घेत धावत सुटले. धावत्या गतीवर बैलगाडी पळवत येवाजीने देवळीच्या पाड्याची सीमा पार केली होती. देवळीच्या मुख्य सडकेची कच्ची वाट चढून येवाजीच्या बैलगाडीने मोठ्या आंबाडच्या शिवार गाठला होता. बुजलेल्या हरणीप्रमाणे डोळे विस्फारून हौसा अंधारात शांत निजलेल्या आपल्या माहेराला पाहत होती. माहेरच्या शिवाराच्या आठवणींचे उमाळे आणि बापाच्या आठवणींनी तिचा कंठ दाटून आला होता. प्रसव कळांच्या वेदनांनी बैलगाडीत पडलेली बायको विव्हळताच बैलगाडी हाकर्णाया येवाजीचे काळीज चिरून निघून होते. हौसाच्या काळजीने अंगात विज संचारावी तद्वत तो बैलांना फटकारून गाडी पळवू लागला. चाबकाच्या भितीने बैलं गाडीला वेगाने पळवताच गाडीचे चाक खड्यात जाऊन आसडू लागले. येवाजी गाडी पळिवत होता नि चंदर आणि लहू दोघेही कंबर कसून पाठमोरी ढेंगा टाकीत धावत्या गतीवर पाय उचलत होते.

पहाटेच्या अंधारात टिपूर पडणारं चांदणं गडप झालं होतं नि वातावरण उदास होऊन पसरलं होतं. देवळीपासून दिड कोसाची कच्ची वाट काढतांना बैलांचा घाम निघाला होता. पवार सरपंचाच्या झापाला वळसा घेऊन येवाजीने धोंडाळपाडा गाव गाठला होता. धोंडाळपाडा गावाची वळणावळणाची नि कच्या रस्त्याची आडवाट काढत त्याने बैलगाडी पुढे झोकवली होती. गावाची चढण चढतांना पायाखालची दगडगोटे बैलगाडीला आसडवीत होते. गाडीला बसणाऱ्या दणक्यांनी गाडीत बसलेल्या मथुरा आणि काशी डोशी पोटूशीला सांभाळत बसून होत्या. येवाजीची गाडी खाचखळग्यात आदळताच हौसा वेदनेनी विव्हळत होती. अंधारात रस्त्यातला दगडगोटा समजत नव्हता नि एखादे वळण आले की बैलगाडी गर्रकन वळून मुख्य रस्ता सोडून खाली उतरत होती. रस्त्यातला एखादा दगड लागला म्हणजे बैलगाडी हातभर वर उचलून खाली दणकन मुरकुंड घेऊन आदळत असायची. गाडीच्या आचक्याने हौसाचे अंग सबकून निघाताच ती जीव एकवटून मधुनच ओरडत होती. बैलगाडीत तिला होर्णाया अनंत वेदनांनी त्या अंधारातली शांतता चिरली जात होती.

ङ्गयेवाज्या जरा दमानं गाडी घे रं पोशा तांव, अंधार पण पका हाय काही दिसं नाय रं जुरुक हाळूच गाडी हाक ङ्गगाडी हाकर्णाया लेकाला मथुरा म्हणाली.

ङ्गहा वं घेतुय दमानं पण अंधारच पका हाय, बेस बेस दिसं पण नाय ङ्गचाबकाचा फटकारा बैलांच्या पाठाणावर उडवत येवाजी उत्तरला.

तांबडं फुटायला अजून बराच अवकाश बाकी होता. अंधारातली वाट काढीत येवाजीची बैलगाडी पोटूशी

हौसाला घेऊन ननाशी गावाच्या सीमेत शिरून पुढे झाली. येवाजीने फॉरेस्टचा सरकारी बंगला मागे टाकीत मोठ्या पाण्याच्या टाकीला वळसा घेतला होता. बैलांचे कासरे आवळीत त्यानेफ्हो "हो करीत बैलं आकळली नि सरकारी दवाखान्याच्या पटांगणात गाडी आणून उभी केली. पोटुशी हौसाला घेऊन दे-वळीच्या पाड्याची मंडळी दवाखान्यासमोर येऊन थांबली होती. पहाटेच्या साखरझोपेत ननाशी

गावातला सरकारी दवाखाना एखाद्या साधुवानी समाधी लावून निमूट शांत पडून होता. चंदर जोपळाने घाई केली आणि त्याने पुढे होऊन दवाखान्याचे मुख्य दार ठोकावले. एका सरकारी बाईने दवाखान्याच्या खो-लीचा दरवाजा उघडताच ती चंदरवर डाफरली होती. अर्ध्या झोपेत असलेल्या सरकारी बाईच्या डोळ्यांत दारात उभा चंदर कुसळासमान सलू लागला. "काय रे काय आहे एवढ्या रात्री? काय वेळिबळ आहे की नाही? ऊर ताणत सरकारी बाईने चंदरला विचारले.

"आ वं मॅडम पेशंट ज आणलाय तांव, लय अवघड झालाय तिलं." चंदर उत्तरला सरकारी बाईने जांभई भरली नि तोंडा-चा आ मिटून तिने चंदरला पुन्हा विचारले, ङ्गपेशंट कुठे आहे पेशंट?"

ङ्गहाय ना वं गाडीत हाय त्या तठं बाहिर उबी हाय गाडीङ्ग बैलगाडीकडे बोट दाखवत चंदर म्हणाला.

"काय पानबिन लागलय का? दुसरं काही आहे?" बाईने विचारले.

"नाय वं मॅडम, गाडीत तहा पोटुशी बाय हाय खालच्या देवळीहून आलुय तहां आठंवर" चंदरने गाडीत पोटुशी बाई असल्याचे सांगताच

दवाखान्याच्या दारात उभ्या बाईची सरकारी बुद्धी जागृत झाली होती. गरोदर माता आणि

कुपोषनासारखा प्रश्न ऐरणीवर असल्याने ती चपळाई करू लागली. दवाखान्याच्या खो-लीत आत जाऊन ती आपल्या जोडीदारांना तात्काळ उठवू लागली. सरकारी दवाखाना जागा होताच एक डॉक्टर साहेबांच्या सरकारी खोलीकडे धावत सुटला. दवाखान्यातील लोकांनी घाई करून बैलगाडीत झोपलेल्या हौसाला खाली उतरवून घेतले. दवाखान्याच्या बाकड्यावर झोपवून तिला खोलीत नेण्याची ते सगळे घाई करू लागले.

कोंबड्याने बांग दिली नि तांबडं फुटू लागताच सूर्याने आपली पुसट तांबेरी किरणे सृष्टी-वर उधळायला सुरूवात केली. पहाटेच्या अंधारात काळा ठसठशीत दिसणारा सरकारी दवाखाना आता सूर्याच्या सोनेरी किरणांमध्ये स्पष्ट दिसू लागला. हौसाला दवाखान्याच्या खोलीत उपचारासाठी नेऊन बराच उशिर झाला होता. हौसाच्या काळजीने येवाजी दवाखान्याबाहेर येरझाऱ्या घालून घामागिर्दी झाला होता. खोलीतील डॉक्टर साहेब बाहेर येण्या-ची तो वाट पाहत होता. मथुरा आई ही काशी

डोशीबरोबर बाहेर ठेवलेल्या बाकड्यावर बसून होती. "देवा या खेपेलं तरी नातू दाखव" म्हणत ती देवाला विणवत होती. लहू धुळा आणि चंदर जोपळा तळहातावर तंबाख मळता मळता दवाखान्याच्या मुख्य खोलीकडे नजर भिरकावत होते. हौसाच्या काळजीने प्रत्येकाच्या चेहऱ्यावर चिंतेने भरलेले भाव दिसत होते.

दिवस हातभर वर आला होता. बऱ्याच उशिराने दवाखान्याच्या खोलीचे दार उघडले नि डॉक्टर साहेब खोलीबाहेर पडतांना येवाजीने पाहिले. खोलीबाहेर आलेल्या डॉक्टर चेहरा त्याला गंभिर दिसत होता. डॉक्टरांनी पेशंटच्या नातेवाईकांची चौकशी करताच येवाजी डॉक्टरांसमोर हात जोडून पुढे आला. वाद-ळापूर्वी उडणाऱ्या धूळमातीची चाहूल लागावी तद्वत डॉक्टरांचा पडलेला चेहरा पाहून येवाजीच्या तोंडचे पाणी पळाले होते. पेशंटचा नवरा असल्याचे सांगताच डॉक्टर साहेबांनी येवाजीला शांतपणे विचारले,

"काय रे बाबा, तुझ्या बायकोचे हे कितवे बाळंतपण?" डॉक्टरांच्या प्रश्नाने येवाजी गोंधळून गेला आणि आपल्या उजव्या हाताची बोटे मोजून डॉक्टरांना म्हणाला,

ङ्गडॉक्टर साहेब, हे आजचं धरून चौथं हायङ्ख

ङ्गअरे गाढवा माणूस आहेस का हैवान?ङ्ख येवाजीला धारेवर धरीत डॉक्टर साहेब येवाजीवर कडाडले. आतापर्यंत शांत असलेले डॉक्टर अचानक संतापलेले पाहून येवाजीच्या अंगाची गाळण झाली. नि तो रडवऱ्या चेहऱ्याने डॉक्टरांकडे पाहू लागला. डॉक्टरांच्या बोलण्याने त्याचा जीव वाराहूरा होऊन सैरभैर धावू लागला. डॉक्टर साहेब येवाजीला काही बोलणार तोच मथुरा आई पुढे आली. सुनेला मुलगा झाला की मुलगी याची तिच्या आत्म्याला भयंकर ओढ लागली होती. नातू झाला की नात झाली हे ऐकण्यासाठी पिंर्जयाबाहेर पडण्यासाठी धडपडर्णाया पाखराप्रमाणे ती धडपडू लागली. डॉक्टर येवाजीला फैलावर घेणार तोच मथुरा आईने डॉक्टरांना विचारले,

ङ्गम्हणजी वं साहेब काय केलय माझ्ये लेकुसनं, बरं ते जाऊदेस सायेब मह्या सुनलं नातू झाला का नात वं?"

"आहो आजी तुम्हांला नातू झाला आहे पण तुमची..?" डॉक्टर साहेबांचे बोलणे पुर्ण होण्याच्या आतच मथुरा आईच्या चेर्हयावर आनंद उसळला नि ती नातू झाल्याच्या बातमीने वेड्यावानी नाचू लागली. नातू झाल्याच्या हर्षापायी ती जवळ उभ्या मुलाच्या गळ्यात उडून पडू लागली. सुनेला मुलगा झाल्याचे ऐकून मथुराला गगन ठेंगणं झाले होते. आनंदाने नाचणाऱ्या बाळंतीण बाईच्या सासुला पाहून डॉक्टरांनी तिथून काढता पाय घेतला नि ते आपल्या खोलीच्या

दिशेने पावले टाकीत निघाले. आपल्याला मुलगा झाला या विचाराने येवाजी हर्षभरीत झाला असला तरी डॉक्टर साहेबांच्या "कितवे बाळंतपण" या प्रश्नाने तो विवंचनेच्या डोहात बुडला होता. डॉक्टर साहेबांच्या बोलण्यातील शेवटच्या "पण" या शब्दाने त्याचे काळीज शिकार झालेल्या हरणावानी धडधडत होते. "अरे गाढवा माणूस आहेस का हैवान?" हे डॉक्टर साहेबांचे बोलणे आठवून त्याच्या काळजाला डागणी बसली होती. येवाजीने चपळाई केली नि तो गर्रकन मागे वळला. अंगात विज संचारवी तद्वत तो वेडापिसा होऊन डॉक्टर र साहेबांच्या पाठमोरी धावत सुटला. थोडे अंतर पुढे चालून गेलेल्या डॉक्टर साहेबांना त्याने क्षणात गाठले नि समोर आलेल्या येवाजीला पाहून डॉक्टर साहेबांना आश्चर्याचा धक्का बसला. समोर उभा येवाजी थरथरत असल्याचे ते पाहत होते. अंगावरून हजारो विषारी सर्प सळसळावे तद्वत थंड पडून येवाजी तसाच उभा होता. डॉक्टर साहेबांना येवाजीने हात जोडले आणि कंप भरलेल्या स्वराने डॉक्टरांना विचारले,

"साहेब मालं पोशा झालाय ही गोट खरी हुई, पण माझी घरवाली हौसा कशी आहे ओ?"

येवाजीने विचारलेल्या प्रश्नाने डॉक्टर साहेबांच्या काळजाच्या ठिकऱ्या उडाल्या होत्या. येवाजी मुलाचा बाप झाला असला तरी त्याच्या आनंदावर काळा ढग आडवा येणार या विचाराने डॉक्टर साहेब गंभिर झाले. येवाजीच्या खांद्यावर आपला थंड पडलेला हात ठेवत डॉक्टर साहेब थरथरत्या ओठांनी म्हणाले,

ङ्गतुला मुलगा झाला हे जरी खरे असले तरी तुझ्या बायकोला आम्ही वाचवू शकलो नाही सॉरी ."

लाखो मधमाश्यांनी एकदाच डंख मारावा तद्वत येवाजी अनेक वेदनांनी चरफडला होता. हौसा गेल्याचे ऐकून तो कोसळला होता. काळजाला पीळ घालून तो बायकोसाठी गुडघ्यात डोकं घालून रडत सुटला. खोलीत मरून पडलेली हौसा येवाजीला वंशाला दिवा देऊन या जगातून कायमची निघून गेली होती.

लेखक:- श्री.गोरक्षनाथ शंकर राऊत
सद्गुरू रो बंगलोज रो.हाऊस.नं
मखमलाबाद-म्हसरूळ लिंकरोड

ओमकार नगर नाशिक ता.जि.नाशिक
पिनकोड-४२२००४
(मेरी पोस्ट हॉफिस )

म

ोबाईल नंबर- ७८७५८२७१७९
७०५७०९८२२९



# ओला दुष्काळ

पडत नाही म्हणता म्हणता
भलताच कोसळून गेलास
माझ्या शिवाराचा हिरवा रान
जरा जास्तच भिजवून गेलास:..

हिरवी पिवळी कोवळी कणसं
फुलती होती उभ्या पिकांवर
त्या कणसांमधला प्राण
तु अवकाळी घेऊन गेलास
पडत नाही म्हणता म्हणता
भलताच कोसळून गेलास:..

डोळे उघडे ठेऊन बघ जरा
गळून पडलेल्या रानास माझ्या
तोंडाशी आलेला घास
तु घटक्यात हिरावून गेलास
पडत नाही म्हणता म्हणता
भलताच कोसळून गेलास::

लेकराबाळांची सणवारं
ठेवली होती तुझ्याच भरवशावर
उमलत्या खेळत्या संसाराला माझ्या
तु निष्ठुरा, करपून गेलास
पडत नाही म्हणता म्हणता
भलताच कोसळून गेलास:..

वाटते भिती मज आता
"जिवन" याच शब्दाची
डोळ्यांत न उरला टिपूस माझ्या
तु वेड्या, मज कोरडा करून गेलास
पडत नाही म्हणता म्हणता
भलताच कोसळून गेलास::

कवी:- श्री.गोरक्षनाथ शंकर राऊत



# मजुरीः

दिवसभर गावभर बुरकाळून आलेल्या चंदरने खाटेवर अंग टाकले होते. खाटेवर पडून वरच्या काळ्याशार आभाळातपडलेल्याटिपूरचांदण्यालातोन्याहाळूलागला. “नुसत्या चांदण्या मोजून काय रहलाय, हातपाय पण हालवायला पाईजी संसारपाण्यासाठी” तापलेल्या तव्यावर भाकर टाकीत शेवंता नर्वयाला म्हणाली. अंगात हत्तीचं बळ असूनही काम न करर्णाया नर्वयाला शेवंता भांडत सुटली. चंदर हा गरीबीने अगदी लाचार नि दुबळा असला तरी कोल्ह्यासारखा धूर्त होता. शेवंताने नवऱ्याला मजुरीवर पाठवण्यासाठी जंग पछाडले पण लोकांच्या बांधावर राबणार नाही या विचाराने चंदरही इरेला पेटला होता. अंगणात खाटेवर पडलेल्या रिकामड्या नर्वयाला पाहून शेवंता एकेरीवर आली होती. चंदरने घाटावर जाऊन मजुरी सोडवून आणावी या विचाराने शेवंता ऊर ताणीत म्हणाली, “का वं तुमचा ईचार कधी पक्का व्हणार, नाय मंजी सगळा लोक घाटावर मजेरी सोडवाय जातुय अन तुमी गावात रिकामा हुंदडून रहलाय” “ये शेवंते ह्यो तुजा रोजचा झालाय बर का गं तोंड बंद कर” खाटेवर अंग घुसळत चंदर म्हणाला. “सगळी माणसा घाटावर मजेरी सोडवाय जात हुवं आन तु रं घुम्या बसलाय आठच गणपती-गत?” तव्यावरची भाकर पलटवत शेवंता म्हणाली. “घरात आलो नाही तर तुझी झाली का कटकट सुरू, अन मी तुलं सांगालाय ना मी जात नाही तहा घाटावर” एकेरीवर येत चंदर म्हणाला. ङ्गतोंडावर शिमग्याचा सण आलाय अन घरात शिपीला दाणा ज नाय अन पैसं पण नाय म्हणून तुलं मजेरीलं सांगुन रहलुय” डोळ्यांच्या पापण्या ओल्या करीत शेवंता म्हणाली. चंदरने खाटेवर कोंबड्यागत अंग फाकडले नि म्हणाला, ङ्गतुझाच तोंड बंद कर अन भाकर झाली हुई त वाढजोस” “वाढतु ना आठचं गिळत बसजोस, कामधाम सोडून तुलं तर नुसता गिळायचा येऊन पडलाय ना” शेवंता हुंदके देत भाकर थापटत म्हणाली. भाकर थापटत बसलेली बायको शांत होण्याचे नाव घेत नसल्याचे पाहून चंदर रागा रागात खाटेवरून उठला आणि भाकर न खाताच शेजारी राहर्णाया हिरामण दाजीकडे निघून गेला.

पहिला कोंबडा आरवला तशी शेवंताला जाग आली होती. ऊन होण्याच्या आत मळ्यात जाऊन कामधामं उरकवून घेऊ या विचाराने चूल पेटवण्यासाठी ती खोपटाबाहेर पडली. खोपटाचा दरवाजा उघडताच धगधगणारी चूल आणि चूलीजवळ बसलेल्या नर्वयाला पाहून शेवंता भांबावून गेली होती. ङ्गकाय वं काय करत्याय आठं? अन होडाक लवकर चूल्यावर पाणी ज कोणालं ठिवलायं गरम करत?” शेवंताने चंदरला विचारले. “तु तुजा आवर जाय, र्हिया दाजी अन मी पहिल्याच गाडीनं जाऊन रहलुय जरा काम हाय “चंदर उत्तरला. “कोठं चाललाय तुमी दोघा, आं तठं काय काम अन होडाक सकाळवानी करून रहलाय तयारी ज?” शेवंताने पडक्या स्वराने विचारले. “आवं शेवंते म्या काय रिकामा नाय चाललुय ईरर्बिहं हुंदडाय, र्हिया दाजीसंगं घाटावर चाल-लूय मजुरीलं” चंदर हसून शेवंताला म्हणाला. “असाक मंजी तु मजिरी सोडवाय घाटामाथ्यावर जाऊन रहलाय तर “गालावरचं हसू खुलवून शेवंता म्हणाली. “हौव शहाणी वं माजी बाय, बरा वं तुलं लवकर कळला” बायकोच्या गाला-चा मुरका घेत चंदर लाडात येऊन म्हणाला. आपला नवरा मजुरीसाठी जाणार असल्याचे पाहून शेवंताला आनंदाचं भरतं आलं होतं. तोंडावर आलेल्या शिमग्याच्या सणाला कमा अणि वशी दोन्ही पोरींच्या अंगावर नवी कापडं दिसतील या विचारांनी ती हर्षभरीत

झाली होती. घाटमाथ्यावर मजूरीसाठी निघर्णाया नर्वयासाठीभाकरतुकडा करण्याचीशेवंतालाघाई झाली. "आ रे! ये सोर्यया काय रं आवरला का नाय आखु? आ रं चाल गड्या, गाडी देवळाखल येऊन थांबली हुई" शेजारी राहणारा हिरामण

कुपाबाहेर उभा राहून चंदरला हाक देत म्हणाला. "आरं ये पोरा र्हिया भाव, झालाय रं त्याचा आवरून, जूरुकथांबजोसतुझ्यादाजीसलंभाकरबांधूनदेतुयतांव" कुपाबाहेर उभ्या लहान भावाला पाहून शेवंता म्हणाली. मेहूण्याचा आवाज ऐकून गळ्यात मफलर गुंडाळत चंदर खोपटाबाहेर पडला नि हिरामणला म्हणाला, "आरं सोर्यया आला पण तु रं, लय लवकर आवरला रं तुझा तर, झालाय माझा आवरून चाल निघy" ङ्ककाय चाल चाल, ही भाकर घेजोस, बांधून ठिवली हायङ्क शेवंता म्हणाली. शेवंताने दिलेला भाकरतुकड्याचा डबा घेऊन चंदर कुपाबाहेर पडला होता. देवळाच्या वाटेने निघालेल्या नर्वयाला पाहून शेवंताच्या डोळ्यांच्या कडा पाण्याने भरल्या होत्या. पहाटेच्या पसरलेल्या काळोखात निघालेला चंदर क्षणात तिच्या दृष्टीआड झाला.

पहाटेला नभातलं खुलवणारं चांदणं दूधासारखं वर्षवू लागलं. कोंबड्याच्या बांगेसरशी सर्व सृष्टी अंधूक प्रकाशात जागी होऊ लागली. देवळासमोर तन्वीर शेटची गाडी माणसांनी खच्चून भरली होती. गाडीत जागा नसल्याचे पाहून चंदर आणि हिरामण सोर्ययाने गाडीच्या टपावर झेप घेत जागा टिपली. उमराळ्याला जायला आता कोणी सिट येणार नाही याचा अदमास घेऊन तन्वीर शेटने गाडी सुरू केली. मारूतीच्या देवळाला वळसा घालून तन्विरची शेटची गाडी करंजाळी गावाच्या दिशेने पुढे मुख्य सडकेला लागली.

पूर्वेला उमटर्णाया प्रकाशाच्या अस्पष्ट रेषेत तन्वीर शेटची गाडी धावू लागली. गाडीच्या टपावर बसलेल्या चंदरला पहाटेचा तो चैतन्यमय वारा झोंबू लागला. पहाटेचा स्वछंदी गारवा त्याच्या मनाला उभार घालू लागला. प्रकाशाच्या अंधुक झरीत आजूबाजूची गावे जागी होतांना तो पाहत होता. चावरी थंडी पडल्याने त्याने मफलरने आपली कानफाडं निट बांधून भोवतालच्या सृष्टीला न्याहाळू लागला.

आजूबाजूच्या उभ्या झाडांना मागे टाकीत तन्वीर शेटची गाडी धावत होती. करंजाळी गावची चढण पार करीत गाडी इनामबारी गावाच्या कमानीला जवळ करत होती.

पहाटेच्या त्या काळोखाला सूर्याच्या पिवळसर किरणांनी दूर सारले होते. सूर्याने हळूवार डोके वर काढताच सावळघाटातील हिरवी वनराई रंग उधळून हसू लागली. सूर्याच्या कोवळ्या किरणांनी सावळघाटाचा माथा उजाळला. नि सकाळच्या निमर्ळ वातावरणात सावळघाटातील वनराई चंदरला तृप्त करू लागली. घाटाची नागमोडी वळणे काढतांना तन्वीर शेटची गाडी माणसांना गदागदा झुलवत होती. वळण येताच गिरकी घेऊन गाडी पुन्हा मुख्य सडकेवर स्थिर होऊन धावत होती. गाडीच्या टपावर बसलेला चंदर गिरक्या घेताच स्वतःला सावरत होता. सूर्याच्या प्रखर तेजाने सावळघाट एखाद्या साधूवानी समाधी घेत शांत पडून असल्याचा चंदरला भासत होता.

सावळघाटाची चढण चढून तन्वीर शेटची गाडी नाशिकच्या मुख्य रस्त्याला लागली आणि थोडे अंतर पुढे होऊन गाडी राजस्थानी ढाब्याजवळ येऊन थांबली. सकाळच्या पहिल्या धारेची चपटी तन्विर शेट घशाखाली घेऊ लागला.

घाईघाईत चपटी संपवून तन्विरने गाडी सुरू केली. धुंद डोळ्यांनी तो गाडीला नाशिकच्या दिशेने पळवू लागला. वर्याच्या वेगाने गाडी पळवून तन्वीरने टोलनाका पास केला आणि थोड्याच अंतरावर असलेल्या चाचडगावाला सारून उमराळा गाव गाठला.

तन्वीरची गाडी उमराळ्याच्या स्टॅण्डला लागताच गाडीच्या टपावरून चंदर आणि बाकी

माणसांनी खाली उड्या घेतल्या. डोक्याला गुंडाळलेली मफलर काढून चंदरने तोंडावरचा घाम पुसला. नि रस्त्याच्या कडेने निघालेल्या जोडीदारांच्या पाठमोरी तो हिरामण दाजीसोबत चालू लागला. पोटासाठी खेड्यापाड्यातून आलेल्या लोकांची जत्रा पाहून तो गांगारून गेला होता. रस्त्याच्या कडेला उभे राहून अनेक मोठे शेतकरी कामाचा सौदा पक्का करून मजुरांना गाडीत कोंबड्यावानी कोंबून घेऊन जात होते. दिवसभर राबवून ते सगळे हातावरल्या मजुरांना पिळून काढत होते. ऊन्हातान्हात दिवसभर राबून मजुर लोकं पदरात पडलेल्या मजुरीवर आपल्या संसाराची गुजराण करीत होते. तिनशे रूपये रोज असूनही घासाघीस करून सागपाड्याची माणसे दोनशे रूपये रोजाने ठरवून एका बड्या शेतकयाने सौदा पक्का केला. नि शंभर रूपये घाटा पदराला बांधून चंदर आणि सागपाड्याची माणसे राबायला मळ्यात निघून गेली.

दिवस कलता होऊन सांजेचा सूर्य तांबूस किरणांनी झाकळला होता. दिवसभर राबून चंदर आणि बाकी मंडळी परतीसाठी उमराळ्याच्या स्टॅण्डला आली होती. कामाची सवय नसलेल्या चंदरचा आज चांगलाच घाम निघाला होता. साईकिरण हॉटेलात चहापाणी करून त्याने घरी बायको पोरींसाठी खाऊ बांधून घेतला.

चंदरचे मन घराच्या ओढीने उडू लागले. आज पहिल्यांदा त्याला शेवंता आणि दोघी पोरींची एवढी आठवण येत होती. घरच्या ओढीने निघालेला चंदर गाडीजवळ येताच त्याला गाडीचा मालक कुठे दिसत नव्हता. शेजारी उभ्या हिरामण दाजीला चंदरने डाफरत विचारले,"काय रं दाजी ह्यो गाडीवाला कोठं दिसत नाय रं याच्या आईसलं याच्ये तर?"
"आरं कुठं जाणार दुसरीकडं तो माजेल, गेला आसल सुकेल नरडं ओलं कराय" हिरामण दाजी उत्तरला.
"मंजी रं दारू ढोसायलं ?" चंदर म्हणाला.
"हौवं ना रं दाजी, त्यो तठं पहाजोस देशीचा दुकान, ह्यो आईस मेया त्यानाहूनच येईल पहाय आता" दारूच्या दुकानाकडे बोट करून हिरामण सोयरा म्हणाला.

हिरामण दाजीचा शब्द खरा ठरला आणि दुकानाकडून झोकांडत येर्णाया तन्विर शेटला चंदरच्या घारीवानी नजरांनी टिपले. तन्वीर शेटला पाहताच गाडीतील माणसे सावरून बसली नि चंदरने गाडीच्या टपावर झेप घेत जागा टिपली. तन्वीरने गाडी सुरू केली आणि हातावर पोट भरणारी माणसे घेऊन तो परतीच्या वाटेला लागला.

दारूने झिंगलेला तन्वीर र्वायाच्या गतीने गाडी पळवू लागला. "आ रं ये पोरा हाळू चालव गाडr" सांगर्णायांना न जुमानता तो गाडी दामटाळू लागला. चाचडगाव मागे टाकून तन्वीरची गाडी टोलनाक्याहून पुढे आंबेगण गावाच्या शिवाराला लागली होती. कडूसं टळून अंधार पडू लागताच गावात दिवे लागण झालेली दिसत होती. आंबेगण गावाच्या गावंदरीला पार करीत तन्वीरने आपली गाडी राजस्थान ढाब्याजवळ आणून थांबवली. गाडीतील माणसे गाडीतच बसवून ठेऊन तो दुकानात शिरला नि चपळाई करीत त्याने दारूची चपटी घशा खाली केली. दुकानातून बाहेर पडत विमलच्या दोन पुड्या दाढेखाली कोंबून तन्वीर गाडी पळवू लागला. राजस्थानी ढाब्याचे अंतर काढून तन्वीरची गाडी सावळघाटाच्या नागमोडी वळणाने घाट उतरू लागली.

सकाळी सोनेरी किरणांमध्ये उजळलेला सावळघाट आता अंधारात बुडतांना गाडीच्या टपावर बसलेला चंदर पाहू लागला. सावळघाटाच्या वनराईला काळोख विळखा घेत असल्याचा त्याला भास होऊ लागला. अंधाराच्या दाट वलयात लपलेली घाट उतरणीची नागमोडी वळणे तन्वीरची गाडी वेगाने उतरू लागली. नागमोडी वळणे उतरतांना गाडी

गिरक्या घेऊ लागली. समोरून येर्णाया गाड्यांच्या दिव्यांच्या प्रकाशामध्ये एकेक वळण मागे पडू लागले. समोरून धावत येणारे मोठमोठे ट्रक अंगावर येत असल्याचे चंदरला भासू लागले. घाटाचा वळणाचा रस्ता कापतांना त्याच्या काळजात धडकी भरत होती. सावळघाटाची नागमोडी वळणे धोक्याची असूनही दारूच्या नशेने धुंद झालेला तन्वीर वाजर्णाया गाण्यांवर बेधुंद होऊन गाडीला वर्यायावानी पळवत होता.

अंधारातील रात्र गर्द काळोखी पडून वातावरण तंग करू लागली. सावळघाटाचा तो रान निर्जन झाला नि चौफेर नि:शब्द शांतता नांदू लागली. काळोखी रात्र विषारी सर्पावानी पुढे सरकू लागली. अंधारात धावत सुटलेली तन्वीरची गाडी थांबायचे नाव घेईना. सावळघाटाला असलेल्या धोक्याच्या वळणाला दारूच्या नशेत धुंद तन्विर गाडीच्या वेगाला आवर घालेना. सावळघाटाच्या निंबुरणीच्या वळणाला गाडी आली नि घात झाला. गाडी वळण घेणार तेवढ्यात समोरून येर्णाया ट्रकच्या दिव्यांनी तन्वीरचे डोळे दिपले गेले. नि दिव्यांच्या प्रखर उजेडाने दारूच्या नशेत असलेल्या तन्वीरच्या डोळ्यांवर अंधारी आली. त्याचा गाडीवरचा ताबा सुटताच पापणी पडायच्या आत गाडी एका सागाच्या झाडावर जाऊन आदळली. झाडाला झालेल्या जबर धडकेत गाडीच्या टपावरची माणसे चेंडूवानी उडाली आणि समोर झाडावर जाऊन आदळली. सावळघाटात झालेल्या अपघाताने मुख्य रस्ता बंद झाला होता. लोकांना वाचवण्यासाठी मदतगारांनी शर्थीचे प्रयत्न सुरू केले. तन्वीरच्या गाडीला झालेल्या अपघाताने सावळघाट आक्रोशाने थरथरला होता.

दगडाखाली डोके चेचून टाकलेल्या सापावानी चंदर दवाखान्याच्या खाटेवर वळवळत होता. दोन दिवसांनी शुद्धीवर आलेला चंदर पडेल नजरेने आजूबाजूला पाहू लागला. दवाखान्यात त्याच्या सभोवती जखमांनी विव्हळणारी आणि आक्रोश करणारी अनेक माणसे त्याला दिसू लागली. सरकारी दवाखान्यात दु:खाची पसरलेली छाया पाहून तो रडूकानी आला होता. उशाला रडत बसलेल्या शेवंताला पाहून चंदरला गलबलून आले नि तो बायकोला म्हणाला, “रडू नको वं शेवंते, बास झाला रडून आता उपेग काय, अन झाला त्ये झाला जाऊ दे मरूदेस,जाऊ आपु घरी चला” चंदरच्या डोळ्याला फुटलेला पान्हा पाहून शेवंताला गहीवरून आले. आपल्यामुळेच नर्वयाचे हाल झाले या विचारांची तिच्या मनाला बोचणी लागली होती. ढाय मोकलून रडर्णाया बायकोला आधार देत चंदर शेवंताला म्हणाला, “शेवंते, गप कर ना आता,काय होडीक रडून रहलीय नुसती, पोरग्या पण रडून रहल्याय पहाजोस” शेवंताला शांत बसायला सांगून चंदरने दवाखान्यात नजर भिरकवली. दवाखान्यात असलेल्या कोणत्याच खाटेवर हिरामण सोयरा त्याला कुठेच दिसेना. हिरामण सोर्ययाची चौकशी करीत चंदरने बायकोला विचारले, “काय वं शेवंते आपला र्हिया दाजीस वं कोठं दिसं नाय, सोयरा बेस तर हाय ना वं?” हिरामण भाऊचे नाव ऐकताच शेवंताचे गलितगात्र क्षीण झाले आणि तिने पुन्हा मोठ्याने हंबरडा फोडला. सावळघाटात तन्वीरची गाडी सागाच्या झाडावर आदळताच गाडीच्या टपावर बसलेला हिरामण सोयरा उडून एका दगडीवर आदळला नि त्याच रात्री त्याने जगाचा कायमचा निरोप घेतला होता. आपला मेहूणा गेल्याचे ऐकून चंदरवर आभाळ कोसळले होते. मेहूण्याच्या आठवणींनी चंदरला गहिवर फुटला नि तो डोळे ओले करून रडू लागला.

बर्याच उशिराने आपण जीवंत असल्याच्या जाणिवेने चंदर भानावर आला होता. खाटेजवळ रडर्णाया दोन्ही पोरींना आणि बायकोला तो शांत करू लागला. दवाखान्यात रडत बसून उपयोग नाही आता घरी गेलेले बरे या विचाराने तो निघण्याची घाई करू लागला.

"शेवंते ऐकला वं, आठं थांबून नाय भागणार, चला आवरा अन घरी निघाय घाय करा" चंदर अंग घुसळवत म्हणाला. चंदरचे घरी जाण्याचे बोलणे ऐकून शेवंतावर अनंत विजा कोसळाव्या अशी तिची अवस्था होऊन गेली. ती जागेवर कोसळली नि तोंडाला पदर धरून रडू लागली. घरी जाण्याचे सांगुनही बायको ऐकत नसल्याचे पाहून चंदर पेटला नि तो रागाने शेवंताला भडकून म्हणाला, "काय वं आता काय आठच थांबायचा अन मुक्काम करायचा विचार आहे का वं?" चंदरच्या बोलण्याने शेवंता आपले तोंड बडवून घेऊ लागली. मोठ्याने आक्रोश करून ती दवाखाना डोक्यावर घेऊ लागली. भान हरपल्यावानी ती वेडी होऊन रडू लागली. शेवंताने एकदाच टाहो फोडला आणि एकाएकी ती ओरडून उठली. खाटेवर पडलेल्या चंदरकडे पाहत डोळ्यात टिपसं आणून शेवंता म्हणाली,"आवं तुमचा पाय वं काय करू वं मी आता, मी मेली अवदसीन कशी झाली, ये देवा माझ्ये येडपणानी तुमचा पाय:."

वेड लागल्यागत रडर्णाया शेवंताला पाहून चंदर हवालदिल झाला होता. बायकोच्या शब्दांचा त्याला अर्थ उमगेना. आपल्यामुळेच नवरा मरणाच्या दारात पडल्याचे शल्य बहुदा तिला सतावित असावे या विचाराने चंदर शेवंताला सावरू लागला. बायकोला सावरण्यासाठी तो अंगाची हालचाल करू लागला. ढाय ढाय रडर्णाया शेवंताला आधार देण्यासाठी चंदर आपले अंग घुसळून उठू लागला. एका हाताला भार घालून त्याने आपल्या पायावरची चादर बाजूला केली. नि चंदर उठणार तोच समोरचे दृश्य पाहून तो गर्भगळीत झाला. आपल्या अंगावरून हजोरो विषारी सर्प सळसळून गेल्याचे त्याला भास होऊ लागले. वादळात एखादा वृक्ष उन्मळून पडावा तद्वत चंदर कोलमोडून पडला होता. घटकाभरापूर्वी आपण जिवंत असल्याच्या उल्हासाने हर्षभरीत झालेला चंदर आता मात्र स्वत:च्या जिवंतपणावर स्वत:लाच कोसू लागला. बायकोच्या घटकाभरापूर्वीच्या "आवं तुमचा पाय वं" या शब्दांचा अर्थ उमगताच तो बसल्या जागी पिसाळला होता. चंदर सैरभैर नजरांनी आकांत मांडून किंचाळत होता. स्वत:वर ओढवलेल्या लाचारपणावर चिडून दात नि ओठ खात होता. पेठच्या ग्रामीण रूग्णालयात रेड्याचं बळ असलेला चंदर लहान मुलासारखा रडत

लेखक:-
श्री.गोरक्षनाथ शंकर राऊत



Bashu ,The Little stranger 1989
Lang - {ersian , G$ilaki
Director -Bahram Beizai

# चित्रपट परीक्षण

इराणचे सिनेमे नेहमी नैसर्गिक असतात. ते माणूस,त्यांच्या भावना,निसर्ग,संस्कृती यांच्याशी अगदी नाळेच्या चिवटपणे जोडलेले असतात. त्यामुळे ते बघताना नेहमीच सहज सुंदर वाटतात. बाशू हा असाच एक सहज सुंदर सिनेमा आहे.

दक्षिण इराणमध्ये कुझेस्तान नावाचा प्रांत आहे.तिथे राहणारा बाशू नावाच्या आफ्रो-इराणी मुलाची ही गोष्ट आहे. इराण इराक यांच्यामध्ये सतत होणाऱ्या युद्धात हा प्रांत होरपळून गेलेला असतो. बाशुचे पूर्ण कुटुंब बॉम्बस्फोटात मारले जाते.आठ दहा वर्षांचा बाशू जीव वाचवण्यासाठी घाबरून एका ट्रकमध्ये लपून बसतो.तो ट्रक प्रवास करत बराच लांब उत्तर इराणमध्ये येऊन पोहोचतो. ट्रक एका ठिकाणी थांबतो तेव्हा बोगद्याच्या कामासाठी सुरुंगाचे स्फोट होत असतात .ते ऐकून पुन्हा हा मुलगा घाबरतो आणि ट्रकमधून उतरून सैरावैरा धावत सुटतो. अखेर तो नाई नावाच्या स्त्रीच्या शेतात

पोहोचतो.ती मध्यमवयीन स्त्री आणि तिची दोन लहान मुले या रंगाने वेगळ्या अनाहुत पाहुण्याकडे आश्चर्याने पाहत राहतात.या रंगाची माणसे त्यांनी पाहिलेली नसतात.तरी स्त्रीकडे उपजत असलेल्या ममत्व भावामुळे नाई त्या बालकाला खाणे पिणे देऊ करते.त्याला तिच्या गिलाकी भाषेत प्रश्न विचारते.

इकडे बाशु सुद्धा खूप घाबरला ,भांबावला आहे.रंग रूप ,भाषा ,खाणे पिणे अगदी वेगळे असलेली ही

माणसे आहेत तरी कोण ? आपण नक्की कोणत्या प्रदेशात येऊन पोहोचलो आहोत ? याचा काहीच अदमास त्या बालकाला लागत नाही. बाशु अरेबिक भाषा बोलत असतो जी नाईला कळत नसते.तरी ती माता या



परक्या मुलाला आश्रय देते. नाईचा पती नोकरी शोधायला शहरात गेलेला असतो.आणि आपल्या शेताच्या तुकड्यावर राबून अशिक्षित नाई आपल्या दोन

मुलांचे पोट कसेबसे भरत असते.त्यात आता या मुलाची भर.पण नाई त्याला सहज स्वीकारते. गावात मात्र या गोष्टीची उलट सुलट चर्चा होते.या वेगळ्या मुलाला गावात ठेवणे योग्य नाही असे सगळ्यांचे मत असते.पण नाई सगळ्यांचा विरोध पत्करून या मुलाला ठेवून घेते. बाशु आणि नाई यांच्या नात्याचा प्रवास दिग्दर्शकाने कोणतीही घाई न करता अगदी नैसर्गिक सहजपणे रेखाटला आहे.सुरुवातीला एकमेकांबद्दल वाटलेले भय आणि कुतूहल हळूहळू आपुलकी,स्नेह,कृतज्ञता,मदत, सहानुभाव असे टप्पे ओलांडत आई मुलाच्या चिरंतन नात्यात परिवर्तित होते तो प्रवास अत्यंत हृद्य होता. कितीतरी छोटे छोटे प्रसंग या प्रवासात दाद घेऊन जातात.एकमेकांची वेगळी भाषा समजून घेण्यासाठी नाई त्याला वेगवेगळ्या वस्तू दाखवते.आपल्या भाषेत त्याला हे म्हणतात तुमच्या भाषेत काय असे करत करत ती शेवटी छातीवर हात ठेऊन मी नाई असे म्हणते आणि तो चटकन मी बाशू असे म्हणतो तो प्रसंग अगदी खेळकर आणि उबदार होता. त्याला आंघोळ घालून त्याचा खरा रंग जाणून

घेणारी नाई पण मजेदार...त्याच्यासाठी गावकऱ्यांचा विरोध हिकमतीने झेलणारी आणि तो एकदा आजारी पडल्यावर औषधासाठी गावकऱ्यांकडे मदतीची याचना करणारी,त्यासाठी अक्षरशः एका बाईची थुंकी
झेलणारी नाई, आई म्हणून किती उंच होऊन जाते... बाशूला स्थानिक मुले स्वीकारायला तयार नसतात.पण एकदा त्या मुलांशी भांडत असताना बाशूच्या हातात शालेय पुस्तकाचे पान पडते.ते पर्शियन भाषेत असते. ते बाशु वाचतो.आपण सगळे इराणची लेकरे आहोत अशा आशयाचे ते वाक्य असते.मुलांच्या ,
नाईच्या मनातले उरले सुरले भेद इथे गळून पडतात. नवऱ्याला पत्र लिहून घेण्याचा ,त्याच्याकडून आलेले पत्र वाचून घेण्याचा प्रसंग भावूक आहे. आठवडे बाजारात वस्तू विकायला घेऊन बसणारी नाई,तिला हिशोबात मदत करणारा बाशु,त्याच्यासाठी घासाघीस करून एक शर्ट विकत घेणारी नाई,बाजार संपल्यावर बाशू न दिसल्यामुळे रिकाम्या बाजारासारखी विमनस्क झालेली नाई...हा प्रसंग सुद्धा फार छान... बाशूला अधून मधून त्याच्या आईचे होणारे भास.. विशेषतः नाईच्या आजूबाजूला ती दिसणे..आणि शेवटी तर बाशुला शोधायला ती निघते तेव्हा त्याची आई बोट करून तिला दिशा दाखवते हे तर अतिशय ग्रेट वाटलं मला. आईचा आत्मा मेल्यानंतर सुद्धा मुलाच्या कल्याणाची काळजी वाहतो आणि आता त्याची आई झालेल्या नाईला दिशा दाखवतो असे यातून सुचवले आहे. शेवटी एकदा खुद्द नाईच आजारी पडते आणि बाशूवर तिची आई होण्याची वेळ येते तो प्रसंग काहीसा नैसर्गिक आणि काहीसा आधिभौतिक दाखवला आहे.खेड्यातले लोकमानस कसे असते त्याची ही एक झलक होती. शेवटी नाईचा नवरा येतो .तोही या परक्या
मुलाचा स्वीकार करतो आणि शेवट गोड होतो.
सुसान तस्लिमी या गिलाकी अभिनेत्रीने नाईची भूमिका अविस्मरणीय केली आहे. बाशु सुद्धा फार छान... काही सिनेमांमध्ये कथेपेक्षा प्रवास महत्वाचा आणि सुंदर असतो.त्यापैकी हा सिनेमा आहे. नाव बाशूचे असले तरी नाई हेच या सिनेमाचे बलस्थान आहे.स्त्रीमधील मातृत्व
गुणाचे,करुणेचे,कष्टांचे,संघर्षाचे,
चिकाटीचे, जिजीविषेचे नाई हे प्रतीक आहे..नाई ही मदर इंडियाच्या धर्तीवर मदर इराण वाटली
मला...अथक कष्ट करून संसार सावरणारी,
मुलांचे भले करणारी,परक्या लेकरालाही आपले
मानणारी, सगळ्यांचे सगळे अपराध पोटात घालून जीवनाला भिडणारी नाई पाहताना एक स्त्री म्हणून स्वतःला आजमावत आले,relate करत आले... स्त्रीला तिची अंगभूत करुणा,मातृत्व कधीकधी असहाय करते की काय असेही वाटून गेले...
पण नाही ,स्त्री मधले हेमातृत्व, ही करुणा,ही
संघर्षरत चिकाटी हाच विश्वाचा आधार असला
पाहिजे...नव्हे तो आहेच...
आमेन ...

ऽ राजश्री बिराजदार



सरी प्रीतीच्या साजना



पावसात ये निरोपा
जरा घेऊन रे मेघा
वाट सजनाची पाहे
जोड मीलनाच्या रेघा

थेंब थेंब सळसळे
मनी मदन उसळे
जलधारांनी वणवा
आत केवढा तो जळे

कसे कुणाला कळावे
विरहात झुरणे हे
उगाळून जीव वेडा
आसरूपी उरणे हे

येतं आभाळ भरून
तुला कितीदा स्मरून
आत पूर दाटतो नि
शांत राहते वरून

बरसू दे आता तुझ्या
सरी प्रीतीच्या साजना
दे ना दिलासा विरही
अधीरशा माझ्या मना

रचना : डॉ.मंजूषा कुलकर्णी

# बांध फुटला डोळ्यातील अश्रूंना बळी हसला

## "अन बांध फुटला"

गणू नावाचा शेतकरी. विदर्भातला. वय चाळीशीच्या उंबरठ्यावर. पिढ्यानब पिढ्या शेती करणारा घरातला एकटाच. यंदा मात्र पाऊस वेळेवर आला, अनब बळीचं भाग्य उजळलं, असं वाटत होतं.सम ोरच धान्याचं पीक उभं होतं. गाई-म्हशी हिरवा चारा खाऊन,दूध दूपते घरात येत होते, होते,गणूने दही-दूध, ताक लोणी.तूपाचा जोड धंदा सुरू केला होता व सारं शुध्द व साजूक असल्याने दारी लोकांच्या रांगा लागू लागल्या. घरातील उदासीनतेचे वातावरण जाऊन हास्य फुलंले. हाती थोडा पैसा खेळू लागला.समोरचं शेतात ज्वारी,तूर,मुगचे पीक बाजरीचं पीक डुलत होते.मक्यावर राघूंचा चिवचिवाट सकाळ पासून चाले.त्यांना तिफण मारणे जीवावर येई. बुजगावण्यालाही ते न भीता त्याच्या अंगाखांद्यावर बसून पंख फडफड करीत बसायचे. त्यांची आपापसातील बडबड ऐकून आपल्यालाही त्यांची भाषा समजू लागते.दोन्ही मुले त्यां पक्ष्यांना पाहून उड्या मारत,खूप आनंदी होते ते निसर्गाच्या सानिध्यात.पशू पक्षी बर्कयांचे कोकरू, मांजरीच्या पिलांशी ती खेळत असत.आई रागवायची पण असूदे ग आए...त्यांना तरी कोण आहे.आणि ती तिफणही चालवू नका बाबा.पक्षी उडून जातात,खाऊ दे दाणे काय होत?" "~रंआ-पण असं करू ?दूसरं छोट शेत या पशू,पक्षांसाठी,गुरं ढोरांसाठी घेऊ.तुम्ही खेळा पण अभ्यासही करा.धारोष्ण दूध मुलांना देत आई म्हणाली"

" हो बाबा आम्ही खूप अभ्यास करू.मोठ्ठ होऊ"

मुलगी म्हणाली ,बाबा आम्ही तुम्हासनी मदत करू."

पण अचानक दिवस पालटले. काही दिवसातच साऱ्या स्वप्नांवर पाणी फिरले. पावसाने,ढग फुटीने कहर केला.पणनिसर्गाचं रूप किती बेभरवशाचं असतं, हे शेतकऱ्या पेक्षा कोणाला जास्त ठाऊक असणार?

पावसाचे हे इतकं भयाण रूप कुटूंब व तो स्वतः डोळ्यांनी बघत होता. गावातील शेतर्कयांच्या आत्म हत्याच्या बातम्या त्याच्या कानावर येत होत्या.

सप्टेंबरच्या शेवटी, हवामान खात्यानं हलकी सरींचा अंदाज दिला होता. पण आला ढगफुटीसारखा मुसळधार पाऊस !तासाभरात आभाळ काळं झालं. नदी नाल्यांना रौद्ररूप आलं. बंधारे फुटले. गावात शिरलं पाणी.व एकच आहाकारउडाला.पशूपक्ष्यांचे हाल कुठे हलवावे त्यांना?

बळीच्या शेतातलं पीक– जे काढणीला आलं होतं–ते अक्षरशः वाहून गेलं. गोठ्यात पाणी शिरलं, दोन गायी बुडाल्या. उरलेली जनावरं उपाशी. घरात पाणी. दारात पाणी. अंगणात चिखल.झाडे मुळासकट कलमडली बायकोने विचारलं, "काय कराव आता. उर बडवून घायकुतीला आली. आता बळींनी कशावर जगायचं.वो धनी. तीने हंबरडा फोडला.

बळी हसला.व हसतच सुटला,दैवाचा खेळ क्षणात विस्कटलेला.पत्नी सुमन व मुलगी यांचे सारं लक्षात आले. अति नुकसानी पै आई ,बाबाला यड लागला,बघ ना कसा करतोय!


शुभ दीपावली
प्रत्येक आवाज ऐकण्याचा परिपुर्ण आनंद ...
अदृश्य अद्ययावत डिजिटल
व रिचार्जेबल श्रवणयंत्र
गोंगाट कमी करणारे अद्ययावत
नामांकित कंपन्यांचे
डिजीटल श्रवणयंत्र
उपलब्ध
SINCE 1993
KULSHREE
HEARING Aids CENTER
श्रवणयंत्र
विक्री व दुरूस्ती केंद्र
Gurukrushna Apartment, Pushpanagari
CHHATRAPATI SAMBHAJINAGAR
Mobile : 9423148170, 9175548170

# संस्कृत सुभाषिते सज्जन कसे असतात?

१ .

संस्कृत साहित्यांत, विशेषतः नाटकांत, सज्जन नायकाची प्रतिमा विशिष्ट प्रकारे दाखवली जाते. धीरोदात्त, संकटातही न डगमगणारा, शत्रूलाही सन्मानाने वागवणारा, द्वेष न करणारा, असा रंगवला आहे. चित्रपट, नाटक आणि मालिका, ह्यांतही नायक तसाच दाखवायचा प्रयत्न असतो. पृथ्वीराज चौहान ह्यांने सोळा वेळा गझनीच्या महंमदाच्या स्वाऱ्या विफल केल्या पण त्याला मारले नाही. त्याला सज्जनपणे माफ केले. शेवटी त्याने पृथ्वीराजाचा पराभव केला, तेव्हां पृथ्वीराजाला जिवंत सोडले नाही. सज्जन असे वागून स्वतःचा मार्ग खडतर करून घेतात. त्यांच्या अडचणींत सतत भर पडते पण ते आपला सत्याचा मार्ग सोडत नाहीत. पुराणकाळापासून आपल्याला अशी अनेक उदाहरणे सांपडतात. सज्जन जर असे वागले नाहीत तर मग त्यांच्यात आणि इतरांत फरक तो काय राहिला. आज आपण सज्जनाविषयीची तीन प्रसिद्ध सुभाषिते पाहूया.

पहिले सुभाषित असे आहे

घृष्टं घृष्टं पुनरपि पुनश्चंदनं चारूगन्धम्~
छिन्नं छिन्नं पुनरपि पुनः स्वादु चैवेक्षुकाण्डम्
दग्धं दग्धं पुनरपि पुनः कांचनं कान्तवर्णम्~
प्राणान्तीपि प्रकृतिविकृतिर्जायते नोत्तमानाम्~

श्री विंझे ह्यांनी केलेला काव्यमय अनुवाद

घासु घासु कितीही तरी त्या चंदना गोड वास
तोडू तोडू पुनरपि तरी गोड लागेच ऊंस.
जाळू जाळू तरी टिकतसे कांचनाचा सु-वर्ण
प्राणांतीही प्रकृती बदले सज्जनांची कधी न

सुलभ अर्थ :- पुन्हा पुन्हा उगाळले तरी चंदन गोड वास देतो, पुन्हा पुन्हा तोडला तरी उस गोड तो गोड, पुन्हां पुन्हां तापविले तरी सोन्याचा सुंदर रंग कायमच, सज्जनही असेच - प्राण गेला तरी मूळ स्वभाव बदलत नाहीत.

२ .

ह्या श्लोकांत अर्थान्तरन्यास हा अलंकार वापरला आहे. अर्थान्तरन्यासामध्ये प्रथम कांही उदाहरणे दिली जातात आणि शेवटच्या ओळींत त्यावरून घ्यायचा बोध दिला जातो. ह्या श्लोकामध्ये प्रथम चंदनाचे उदाहरण दिले आहे. सुगंध देणारे चंदन पूर्वी अनेक कारणांसाठी वापरत. पूजा, अंगाला चंदनलेप, औषधी वनस्पती म्हणून, अत्तर, इ. आता चंदन घरोघरी वापरलं जात नाही. तरीही पूजेला चंदनाचा वापर होतो. चंदनाचे खोड सहाणेवर घासतात आणि चंदनाचा घट्ट द्रव गंध म्हणून देवाला लावतात. प्रत्येक वेळी चंदन घासले कि चंदनाचे खोड लहान होते. पण चंदनाचा सुवास मात्र खोड संपत आले तरी कायमच रहातो. दुसरे उदाहरण दिले आहे उसाचे. उस खाण्यासाठी त्याचे छोटे छोटे तुकडे केले जातात. कोणी त्याला उसाचे कर्वे म्हणतात. उसाचा कितीही छोटा तुकडा गोडच लागतो. बहिणाबाई उसाबद्दल म्हणतात की तो जरी वाकडा असला तरी त्याचा रस कांही वाईट होत नाही, तो गोडच असतो. थोडक्यांत काय तर उस आपली गोडी सोडत नाही. अगदी चरकांत

घालून पिळला व त्याचे चिपाड केलं तरी तो गोड रसच देतो. तिसरं उदाहरण आहे सोन्याचं. सोनं

विस्तवात टाका, कितीही तापवा, ते आपला कांतिम ान रंग सोडत नाही. उजळपणा झळाळतच रहातो. ही तीन उदाहरणे देऊन चौथ्यामधे म्हटलं आहे की सज्जन लोकही असेच असतात. त्यांच्यावर कितीही आपत्ती आल्या, प्राण जायची वेळ आली तरी ते आपला चांगुलपणा बिलकुल सोडत नाहीत. राजा हरिश्चंद्र ह्याची कथा प्रसिद्ध आहे. त्याच्यावर दारिर्द्य, कुटुंबा-ची ताटातूट, कसायाचे काम करण्याची वेळ, आदी अनेक मानहानीचे व दुःखाचे प्रसंग येतात पण तो सत्यवचनी राजा आपला शब्द मोडत नाही. सर्व विपत्ती सहन करतो. आजही त्याचे उदाहरण दिले जाते.

आता दुसरा श्लोक पाहू-

वज्रादपि कठोराणि मृदूनी कुसुमादपि ।
लोकोत्तरानां चेतांसि को हि विज्ञातुमर्हति

फुलांहुनी मऊ, तैशी वज्राहून कठोर ती।
लोकोत्तरांच्या चित्ताते कोण हो पूर्ण जाणती

सुलभ अर्थ - वज्राहून कठीण पण त्याच वेळी फुलांहूनही मऊ अशा लोकोत्तरांच्या हृदयाचे यथार्थ ज्ञान कोणाला होऊ शकेल?

३ .

दुसरा श्लोक साधाच आहे. ह्यामध्ये जे महान पुरूष असतात, त्यांची हृदये कशी असतात, हे सांगित-ले आहे. एकाच वेळी त्यांचे चित्त वज्राप्रमाणे (इंद्राचे शस्त्र) कठीण असते. त्याचा भेद करणे अशक्यप्राय असते. तसेंच ह्या व्यक्तींचे हृदय कठोर असते.

साधारण घटनांनी, कठीण प्रसंगात, ते अजिबात डगमगत नाहीत. मात्र एखाद्या गरीबाच्या यातना पाहून ते कळवळतात. अशा प्रसंगात त्यांचे मन फुलासारखे कोमल असते. वरवर पहातां हा विर-ोधाभास आहे. आब्राहाम लिंकनचे चरित्र वाचले असता हा हा विरोधाभास सहज दिसून येतो. समजतात.

४ .

श्लोकाच्या दुसऱ्या चरणांत म्हटले आहे की अशा लोकोत्तर पुरूषांना मनाला कोण पूर्ण जाणू शकतो? ह्या प्रश्नाचे उत्तर अर्थात कोणी जाणू शकत नाही, हेच आहे. ह्यामुळेच अनेकदा महान व्यक्तींबद्दल समाजांत वाद असतात. कांही जणांना जी व्यक्ती महान वाटते, ती इतरांना वाटत नाही. सर्व लोकांची त्यांना समजून घेण्याची पात्रता नसते. आपल्या येथे आज महात्मा गांधी, स्वातंत्र्यवीर सावरकर ह्यांना कांही लोक लोकोत्तर, असामान्य मानतात तर कांही जणांना त्यांचा मोठेपणा मुळीच मान्य नाही. कांहींना महात्मा गांधींचा मोठेपणा मान्य नाही तर कांहीना सावरकरांचा मोठेपणा मान्य नाही. डॉक्टर आंबेडकर ह्यांना बहुसंख्य भारतीय थोर मानतात. तरीही कांहीजण त्यांच्यावरही टिका करतात. ह्याचे कारण हेंच आहे की लोकोत्तर माणसांची मने पूर्णपणे समजून घेणं सामान्यांच्या कुवतीबाहेरच काम आहे. ह्याचा व्यत्यास मात्र खरा नाही. ज्यांच्या मोठेपणाबद्दल समाजांत वाद आहेत, ज्यांच्या मनांत काय आहे, हे समजत नाही, ते सगळेच लोकोत्तर नसतात. तर कांहीजण लबाड वा धूर्त असतात.

तिसरा श्लोक असा आहे-

अयं निजः परो वेति गणना लघुचेतसामब ।
उदारचरितानां तु वसुधैव कुटुम्बकम~

"हा माझा, हा पराचा', हे मानिती क्षुद्र ते मनी
पृथ्वी हीच कुटुंबीय उदारहृदयी गणी

सुलभ अर्थ-

हा आपला, हा परका, ही विचारसरणी कोत्या मनाच्या लोकांची असते, उदार, हे सारे जगच कुटुंब

५ .
हा तिसरा श्लोक महाउपनिषदामधील आहे.
श्री विंझे ह्यांनी ह्याचा संदर्भ चौदाव्या शतकातील शारंगधरपध्दति दिला आहे. शारंगधरपध्दति हे शरिरचिकित्सा व उपाय ह्याविषयी आहे. इतरत्र कांही ठीकाणी हितोपदेशाचा संदर्भ देण्यांत आला आहे. चौदाव्या शतकांतील काव्यांमधे जरी तो सांपडत असला तरी मूळ श्लोक हा महाउपनिषदांतील आहे, ह्यांत शंका नाही. महाउपनिषद कधी लिहिले गेले, ह्याबद्दल निश्चित माहिती उपलब्ध नाही. इसवी सन पूर्व कालांत लिहिले गेले, असे अंदाजाने म्हटले जाते, कांहीजण हा काळ महाभारताच्या आधीचा म्हणून इ. स. पूर्व ५००० पर्यंत मागे नेतात. तर कांही तो इ.स पूर्व दीड ते २००० वर्षे मानतात. कांही असो तो खूप प्राचीन काळांतील आहे. भारतीय तत्वज्ञानांत महत्वाची जागा असणाऱ्या उपनिषदांत हा एक विचार आहे.
६ .
आपल्याकडील कांही पुरोगामी विचारवंत आणि पूर्वीच्या सर्व गोष्टींना सनातनी थोतांड मानणाऱ्यांपैकी बऱ्याच जणांनी हा श्लोक कधी वाचलाही नसेल.

इतरांनीही "वसुधैव कुटुम्बकम्" एवढाच उल्लेख वाचला असेल, पूर्ण श्लोक माहित नसेल. इंटरनेट आर्काईव्हजब ह्या गुगल साईटवर संपूर्ण महा उपनिषद भाषांतरासह उपलब्ध आहे. एकदा आपण आपल्याच तत्वज्ञानाला पौराणिक शिक्का मारून त्याज्य ठरविल्यावर आपण तिकडे ढूंकूनही पहात नाही. कारण आपल्या समाजाला सनातनी आणि पुरोगामी असं आपल्याच समाजाचं विभाजन करून भांडण्यांत, एकमेकांना दूषणे देण्यांतच रस असतो. हा श्लोक व त्याचा विचार करण्याची आपल्याला इच्छा नसते. हा श्लोक आता भारताच्या संसद भवनाच्या दरवाजावरही लिहिला आहे. एका पक्षाने तो जागतिक परीषदेत स्वागताला वापरला, त्यामुळे इतर विरोधी पक्षांना तो मान्य होणार नाही. ज्या पक्षाने तो जागतिक परिषदेत वापरला, त्यांनी तो स्वीकारल्याचे प्रथम त्यांच्या देशांतर्गत व परराष्ट्र व्यवहारांत ठळकपणे दिसायला हवा.
७ .
श्लोक अगदी सरळ आहे. अयं म्हणजे हा माझा, परो वेति म्हणजे हा इतर (माझा नव्हे), अशी लोकांची गणना, म्हणजे शब्दशः मोजणी पण खऱ्या अर्थाने संभावना, लघुचेतसामब म्हणजे कोते मन असणारे लोक. पहिल्या ओळीचा पूर्ण अर्थ असा की कोत्या मनाचे लोक हा माझा हा परका, अशी लोकांची संभावना करतात व तसा त्यांच्याशी व्यवहार करतात. दुसरी ओळ सांगते उदारचरितानामब तु वसुधैव कुटुम्बकम~. उदारचरित म्हणजे ज्यांचे विचार उदात्त आहेत, सर्वसमावेशक आहेत, त्यांना संपूर्ण पृथ्वी हेंच एक कुटुंब वाटते. महा उपनिषदांतील मूळ श्लोकांत सुरुवातीचे शब्द थोडे वेगळे आहेत. "अयं निजः परो वेति' ऐवजी "अयं बन्धुरयं नेति' म्हणजे हा बन्धु आहे, आप्त आहे, आपला आहे. "अयं नेति' म्हणजे हा बन्धु किंवा आप्त-मित्र नाही. बाकी अर्थ तोच आहे.
८ .
स्वामी विवेकानंदानी जेव्हा सर्वधर्मपरिषदेत सर्वांना "बंधु आणि भगिनींनो" असं संबोधलं, तेव्हा त्यांना हा विचार उपनिषदाच्या, भारतीय संस्कृतीच्या विचारांतूनच मिळाला हे निश्चित आहे. महात्मा गांधीचे बरेच विचार चुकीचे वाटतात, ते मुख्यतः ह्या सर्व विभाजना मुळे. वसुधैव कुटुम्बकम~ ह्या संकल्पनेंतून पाहिल्यास त्यांचे विचार मान्य होतील. ह्यांत खरी अडचण हीच आहे की अशा उदात्त कल्पना एकाने आचरणांत आणून कांही उपयोग होत नाही. त्याला दुसऱ्यांचा तसाच प्रतिसाद हवा. राष्ट्र, राज्य, सीमा, इ. कल्पना किंवा जात, धर्म, वंश, वर्ण, इ. भेद हे एकमेकांवर कुरघोडी

करण्यासाठी जोपर्यंत वापरले जात आहेत, तोपर्यंत हा विचार कागदावर राहण्याची शक्यता जास्त आहे.
९ .
ह्या श्लोकावर भाष्य करणाऱ्या कांही जणांनी ह्यांतील वसुधा ह्या शब्दाचा अर्थ केवळ पृथ्वी व पर्यायाने पृथ्वीवरील मानव नव्हेत तर वसुधा शब्द-ांत संपूर्ण जीवसृष्टी व समुद्र, पर्वत, नद्याही कुटुंबीय मानल्या आहेत. त्यांचे संरक्षण वा संवर्धन ही सुध्दा

मानवाची जबाबदारी धरली आहे. थोडक्यांत पर्यावरणाचाही विचार त्यांत आहे. हा बदल जगांत एका दिवसांत घडणार नाही परंतु निदान हा विचार रूजला पाहिजे ही जाणीव देशोदेशीच्या विचारवंताना, लेखकांना, नेत्यांना तत्त्वतः मान्य झाली तरी खूप फरक पडेल. असा सुदिन लवकर येवो, हीच इच्छा.

अरविंद खानोलकर



"हे हसू वेडसर पणाचे होते. ,ते पाहून वाचा पान --३२

पुढे चालू----

मुलगी व सुमनचे डोके दुःखानं सुन्न झालेल ं होतं.हे हसू संयम सुटल्या नंतरच हसू होते. वर

डोळे मात्र सुकले नव्हते. ते सतत ओथंबत होते.याच्या मुलीनं त्याचं ओला शर्टा ला हात लाऊन विचारलं, "बाबा, तू रडतोयस का?यानं हसून उत्तर दिलं–"नाही गं, आपलं नशिब,त्याने कपाळा- वर हात मारला.अग शेतीचा बांध ,बघ ना फुटलाय." व तो वेड्यागत हसत सुटला,...

या कहाणीच्या पाठीमागे केवळ एक बळी नाही–तर हजारो बळी आहेत. ज्यांचं आयुष्य निसर्गावरअवलंबून आहेत.तोच आता लहरी झालेला दिसत आहे.

हवामान बदल, ढगफुटी,बे भरवशाचा पाऊस या मुळं फक्त शेतीचं नुकसान होत नाही, तर शेतकऱ्याचं मानसिक आरोग्यही ढासळतं. उपासमारी, आत्महत्या, कर्जबाजारीपणाची चिखलफेक चालूच असते.येथे संयमाचा, आशेचा, आणि माणुसकीचा बांध फुटलाय.आसमानच फाटलं तर ठिगळतरी कुठे कुठे लावणार?

शासकीय मदत मिळेल पण वेळ लागेल. व सामाजिक आंदोलन होईल. बळीचा संघर्ष वा हतबलता कधी संपतील सांगता येत नाही.......



लेखिकाः अनघा कुलकर्णी.
लोहगाव,पुणे.
९९६७३६०६५७.

## “शब्दांकुर” प्रस्तुत सुमधुर कवितांचा बहारदार कार्यक्रम - ओंजळीतील शब्दफुले” 

(सामाजिक सांस्कृतिक साहित्यिक कार्यक्रम, कौटुंबिक समारंभ/कार्यक्रम, शाळा, शैक्षणिक, सामाजिक संस्था, ज्येष्ठ नागरीक संघ, सोसायटी इ. विविध ठिकाणी उपयुक्त)




वैशिष्ट्ये :

❋ प्रामुख्याने स्वरचित कविता सादर केल्या जातील.

❋ कवितेच्या माध्यमातून रसिकांशी गप्पा, संवाद, मनोरंजन आणि समाज प्रबोधन.

❋ तीन जिल्ह्यातील कविंचा त्रिवेणी संगम.

❋ आपल्या मागणी प्रमाणे १ ते २ तासाचा कार्यक्रम सादर केला जाईल.

❋ संपूर्ण महाराष्ट्र आणि महाराष्ट्रा बाहेरही कार्यक्रम स्विकारले जातील.

❋ प्रयोगासाठी आणि अधिक माहितीसाठी वरील नंबरवर संपर्क साधावा.

आपला स्नेहांकित

विजो (विजय जोशी)

डोंबिवली

# नभरंग दिवाळी विशेष
# २०२५ वर्षाचं खास राशीभविष्य
## मेष

नवीन कल्पनांचा वर्षाव होईल. करिअरमध्ये धाडस करून घेतलेले निर्णय यश देतील. पैशाची ये-जा राहील पण वर्षाच्या अखेरीस हातात समाधान असेल. प्रेमात थोडी संयमाची गरज. आरोग्य उत्तम, पण झोप कमी होऊ देऊ नका.

## वृषभ

घर, गाडी, जमीन – काहीतरी मोठं मिळण्याची शक्यता. नात्यांमध्ये गोडवा वाढेल. ऑफिसमध्ये मेहनतीचं फळ मिळेल. खर्च वाढेल पण आनंदही तितकाच येईल. संगीत, कला, प्रवास यांचा आनंद घ्या.

## मिथुन

नवीन ओळखी नशिबात बदल घडवतील. शब्दांवर नियंत्रण ठेवा – तुमचं बोलणं या वर्षी प्रभावी पण तीक्ष्ण असेल. सोशल मीडिया प्रसिद्धी वाढेल. आरोग्याकडे थोडं लक्ष द्या, विशेषतः डोळे आणि खांदे.

## कर्क

कुटुंब आणि घर यावर्षी केंद्रस्थानी. भावनिक निर्णय न घेता शांतपणे विचार करा. आर्थिक स्थिती स्थिर राहील. प्रेमात जुना गोंधळ सुटेल. प्रवासाचे योग उत्तम, पण पावसात थोडं जपून राहा.

## सिंह

तुमचं तेज पुन्हा झळकणार! कार्यक्षेत्रात नेतृत्व मिळेल. कला, अभिनय, लेखनात यश. पण अहंकारावर नियंत्रण ठेवा – तोच अडथळा ठरू शकतो. प्रेमात नवे रंग येतील. आरोग्य चांगले.

## कन्या

तुमचं नियोजन आणि बारकाई यशस्वी ठरेल. कामात प्रगती, पण भावनांना जास्त महत्व दिल्यास ताण वा-

ढेल. खर्च नियोजन आवश्यक. वैवाहिक जीवनात समज वाढेल. ध्यान आणि संगीत लाभदायक.

## तूळ

तुमच्या आकर्षक व्यक्तिमत्त्वामुळे लोक आकर्षित होतील. नाती नव्या वळणावर जातील. व्यवसायासाठी उत्तम काळ. पैशाचे योग्य नियोजन करा. कला आणि सर्जनशीलतेत मोठं यश मिळू शकतं.

## वृश्चिक

गुप्त इच्छा या वर्षी पूर्ण होण्याची शक्यता! आत्मविश्वास वाढेल, पण रागावर नियंत्रण आवश्यक. आर्थिकदृष्ट्या चांगले दिवस. नात्यांमध्ये पारदर्शकता ठेवा. आरोग्य उत्तम.

## धनु

विदेश, प्रवास, शिक्षण - या तिन्ही क्षेत्रात शुभ संधी. घरात शुभकार्य योग. नवी नोकरी किंवा प्रकल्प मिळू शकतो. मित्रांकडून मदत मिळेल. आनंदी आणि हलकं मन ठेवा.

## मकर

कठोर परिश्रमाचं फळ हाती येईल. पदोन्नती, सन्मान आणि प्रतिष्ठा वाढेल. नाती अधिक घट्ट होतील. घरात थोडा गोंधळ असला तरी तो लवकर शांत होईल. आरोग्य उत्तम, पण आहार सांभाळा.

## कुंभ

तुमच्या कल्पनांना जग दाद देईल. संशोधन, तंत्रज्ञान, कला - सगळीकडे चमकाल. नवी मैत्री लाभदायक ठरेल. खर्चावर नियंत्रण ठेवा. मनाची शांती मिळवण्यासाठी प्रवास करा.

## मीन

स्वप्नं सत्यात उतरण्याचं वर्ष! भावनिकदृष्ट्या समृद्ध, पण वास्तवाशी जोडून राहा. प्रेम आणि सर्जनशीलतेत यश. पैशाचा प्रवाह स्थिर राहील. ध्यान आणि लेखन उपयुक्त.

# नभरंग प्रतिष्ठान
# संस्थेचे ध्येय व कार्य:

नभरंग प्रतिष्ठान ही एक सांस्कृतिक संस्था असून, कला आणि कलाकारांच्या सर्वांगीण विकासासाठी कार्यरत आहे. संस्थेचे मुख्य उद्देश आणि उपक्रम पुढीलप्रमाणे आहेत:

सांस्कृतिक क्षेत्रात कार्य करणे – नाट्य, संगीत, चित्रपट, साहित्य आणि इतर कलाक्षेत्रांमध्ये सक्रिय सहभाग आणि योगदान.

नवोदित कलाकारांना व्यासपीठ उपलब्ध करून देणे – नवीन कलाकारांना संधी मिळावी यासाठी विशेष कार्यक्रम आणि मंच उपलब्ध करणे.

विविध स्पर्धांचे आयोजन करणे – नाट्य, गायन, नृत्य, चित्रकला, कथा लेखन इत्यादी विविध स्पर्धांचे आयोजन.

मान्यवर कलाकारांचे वाढदिवस साजरे करणे – दिग्गज कलाकारांच्या कार्याचा गौरव करून त्यांचा सन्मान करणे.

व्याख्यानांचे आयोजन करणे – कलाक्षेत्राशी संबंधित विविध विषयांवर तज्ज्ञ व्यक्तींची व्याख्याने आयोजित करणे.

नाट्य व चित्रपट शिबिरांचे आयोजन करणे – अभिनय, पटकथा लेखन, दिग्दर्शन यांसारख्या कौशल्यांसाठी विशेष प्रशिक्षण शिबिरे आयोजित करणे.

संस्थेचे उद्दिष्ट:

कलावंतांना प्रोत्साहन देऊन समाजात कला व संस्कृती यांचा प्रसार करणे, तसेच नवोदित कलाकारांना योग्य मार्गदर्शन आणि संधी उपलब्ध करून देणे हे नभरंग प्रतिष्ठानचे प्रमुख उद्दिष्ट आहे.

नोंदणी क्र/ महा /१९१/२०२१

अधिनियम  १९५० एफ २६४१३ औ

नभरंग या संस्थेसाठी देण्यात येणारे धनादेश , “नभरंग प्रतिष्ठान  “ या नावाने देण्यात यावेत

बँक : Cosmos co o{erative  bank ltd शाखा : दशमेश नगर

A/C : ९१२१००१०५४१ , ISFC Code : COSB०००९१२


ARTIST SPHERE
PROMOTE YOUR TALENT


Happy Diwali